# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

## मा.स्थायी समिती
## कार्यपत्रिका क्रमांक- २४६
**(सभावृत्तांत)**

**दिनांक- २७/१०/२०२१** **वेळ – दु.२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार, दिनांक **२७/१०/२०२१** रोजी **दु.०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा. उप सचिव महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.२२ ऑक्टोबर २०२१ अन्वये आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे - सभापती**
२. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
३. मा.संतोष बबन कांबळे
४. मा.अभिषेक गोविंद बारणे
५. मा.बुर्डे सुवर्णा विकास
६. मा.फुगे भिमाबाई पोपट
७. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
८. मा.सुलक्षणा राजू धर
९. मा.सुजाता सुनिल पालांडे
१०. मा.भोईर सुरेश शिवाजी
११. मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
१२. मा.यादव मीनल विशाल
१३. मा.पाडाळे निता विलास

याशिवाय मा.राजेश पाटील- आयुक्त, मा.ढाकणे- अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप- नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त(३), मा.राजन पाटिल- शहर अभियंता, मा.इंगळे, मा.लोणकर, मा.खोत, मा.चारठाणकर- उप आयुक्त, मा.चव्हाण- सह शहर अभियंता, मा.जोशी, मा.देशमुख, मा.दांगट- सहाय्यक आयुक्त, मा.गट्टुवार, मा.ओंबासे, मा.वाघुंडे, मा.लडकत, मा.देशमुख, मा.खाबडे, मा.घोडे, मा.धुमाळ, मा.चव्हाण, मा.गलबले, मा.मोरे, मा.गायकवाड, मा.नरोन्हा- कार्यकारी अभियंता, मा.गावडे- मुख्य अग्नीशामक अधिकारी, मा.पाटील- प्राचार्य (आय.टी.आय. मोरवाडी) हे अधिकारी उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

विषय क्र.३६) सन २०२०-२१ या वर्षातील संचलनतुटीची अगाऊ रक्कम अदा करणेबाबत.

विषय क्र.३७) सन २०२०-२१ या वर्षातील संचलनतुट मधून अगाऊ रक्कम पीएमपीएमएल संस्थेस अदा करणेबाबत.

विषय क्र.३८) भटक्या प्राण्यांसाठी ॲनिमल शेल्टर (प्राणी सुश्रुषा केंद्र) व औषधोपचार केंद्र सुरु करणेबाबत.

विषय क्र.३९) कासावाडी आरक्षण क्र.१३ मध्ये खेळाचे मैदान विकसित करणे या कामांतर्गत मे.ध्यानचंद पॉलिग्रास हॉकी मैदान नेहरूनगर येथे विद्युत विषयक कामकाज करणेकामी येणा-या मुळ कामाच्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत.

विषय क्र.४०) कोरोना काळामध्ये ऑटो क्लस्टर येथे उभारण्यात आलेल्या कोविड सेंटरची फिल्म बनविणेकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत.

विषय क्र.४१) किऑक्स मशीनद्वारे लसीकरण टोकन पद्धतीबाबत नागरीकांमध्ये जनजागृती करणेकामी तयार करण्यात आलेल्या व्हिडीओचे खर्चास मान्यता देणेबाबत.

विषय क्र.४२) कोविड १९ करीता फिल्ड सर्व्हिलन्स टिम करीता भाडे तत्वावर घेण्यात आलेल्या वाहनाचे खर्चास मान्यता देणेबाबत.

विषय क्र.४३) कोविड १९ करीता कोविड केअर सेंटर व क्वारंटाईन सेंटर येथील व्यक्ती व रुग्णांना जेवन व नाष्टाचे खर्चास मान्यता देणेबाबत.

विषय क्र.४४) अभ्यास दौरा आयोजनाबाबत. मा.कांबळे अंबरनाथ व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४५) प्रभाग क्र.१९ मधील गोलांडे उदयानाशेजारील सी.डी.वर्कची उर्वरीत कामे करणे या कामाच्या जागेत बदल करणेबाबत.- मा.फुगे भिमाबाई व मा.कांबळे अंबरनाथ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४६) मा.स्थायी समितीची दि.१०/११/२०२१ ची नियमित साप्ताहीक सभा दि.११/११/२०२१ रोजी घेण्याबाबत.- मा.भोईर सुरेश व मा.कांबळे अंबरनाथ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४७) कोविड मुळे मृत्यु पावलेल्या कुटुंब प्रमुखाच्या कुटुंबाना मदत देताना वयाची मर्यादा रद्द करणेबाबत.- मा.भोईर सुरेश व मा.कांबळे अंबरनाथ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४८) सर्व क्षेत्रिय कार्यालयात फायर स्टेशन उभारणे व अग्निशामक छोटी वाहने खरेदी करणेबाबत. मा.बापु उर्फ शत्रुघ्न काटे व मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४९) विभागांतर्गत तरतुद वर्गीकरणाबाबत.- मा.कांबळे अंबरनाथ व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५०) तरतुदीमध्ये वाढ/ घट करणेबाबत.- मा.कांबळे अंबरनाथ व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५१) तरतुदीमध्ये वाढ/ घट करणेबाबत.- मा.बुर्डे सुवर्णा व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५२) तरतुदीमध्ये वाढ/ घट करणेबाबत.- मा.कांबळे अंबरनाथ व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५३) तरतुदीमध्ये वाढ/ घट करणेबाबत.- मा.कांबळे अंबरनाथ व मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५४) तरतुदीमध्ये वाढ/ घट करणेबाबत.- मा.कांबळे अंबरनाथ व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५५) तरतुदीमध्ये वाढ/ घट करणेबाबत.- मा.कांबळे अंबरनाथ व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५६) तरतुदीमध्ये वाढ/ घट करणेबाबत.- मा.कांबळे अंबरनाथ व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५७) तरतुदीमध्ये वाढ/ घट करणेबाबत.- मा.कांबळे अंबरनाथ व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५८) तरतुदीमध्ये वाढ/ घट करणेबाबत.- मा.कांबळे अंबरनाथ व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५९) तरतुदीमध्ये वाढ/ घट करणेबाबत.- मा.कांबळे अंबरनाथ व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६०) तरतुद वर्गीकरणाबाबत.

-----------

मा.स्थायी समिती सभा कार्यपत्रिका क्र.२४४ दि.१३/१०/२०२१ चा सभावृतात कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-----------

ठराव क्रमांक- १०५२३ विषय क्रमांक- ०१

दिनांक- २७/१०/२०२१ विभाग- मध्यवर्ती भांडार

सुचक- मा.अभिषेक बारणे अनुमोदक- मा.कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा.अति. आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मभां/८/कावि/१६३१/२०२१, दि.१४/१०/२०२१.

मा.अति. आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७ (३) (क) यास अधिन राहून कोरोना विषाणुचा (Covid-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी वैद्यकीय उपचारा दरम्यान रुग्णांची तपासणी करताना आवश्यक असणारे Non – Sterile Latex Examination Gloves Small, Medium, large आवश्यक आहे. खरेदी करणेकामी प्रसिध्द केलेल्या ई-निविदेच्या अनुषंगाने M/s.Medinilla Health Care यांचेकडून Innovativ Biosciences Pvt Ltd कंपनीचे Non – Sterile Latex Examination Gloves Small, Medium ,large, खरेदीकरणे करीता Per Gloves २.८० + GST या दराने खरेदी करण्यासव (निविदा र.रु. ४५,९९,९००/- पेक्षा -३७.७७% कमी दराने) येणा-या र.रु.२८,६२,१६०/- (अक्षरी र.रु.अठ्ठावीस लाख बासष्ठ हजार एकशे साठ फक्त) + GST चे खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५२४ विषय क्रमांक- ०२

दिनांक- २७/१०/२०२१ विभाग- मध्यवर्ती भांडार

सुचक- मा.अभिषेक बारणे अनुमोदक- मा.कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा.अति. आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मभां/१५/कावि/२२७/२०२१, दि.१८/१०/२०२१.

मा.अति. आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे

भारतीय साथरोग अधिनियम १८९७, सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना दि. १४/०३/२०२० आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ कलम (४१ व ५०), महानगरपालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७ (३)(क) नुसार कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मनपामार्फत स्थापन केलेल्या Covid Care Center व Institutional Quarantine Center येथील रुग्ण तसेच नियुक्त केलेले कर्मचारी यांना गरजेनुसार जेवण व नाष्टा उपलब्ध करुन देणेकामी ई निविदा सूचना क्रमांक १०/२०२०-२१ अन्वये प्राप्त झालेला लघुत्तम दर र.रु.१८०/- प्रति दिन प्रति व्यक्तियानुसार एकूण १५ पुरवठादार निश्चित करणेत आलेले आहेत. त्यानुषंगाने निर्गत करणेत आलेल्या पुरवठा आदेशानुसार दि. १८/०४/२१ अखेर र.रु.१८०/- प्रति दिन प्रति व्यक्ति व दि.१९/०४/२१ पासून रुपये २३०/- प्रति दिन प्रति व्यक्तीयाप्रमाणे सबंधित

पुरवठादारांनी प्रति दिन दुपारचे/रात्रीचे यापैकी ज्या वेळेस कमाल जेवणाचा पुरवठा केलेला आहे त्यानुसार सबंधित कोविड केअर सेंटरचे पाक्षिक अहवाल विचारात घेऊन विषयाच्या सविस्तर तपशिलामध्ये नमुद केलेल्या कालावधी मध्ये होणा-या र.रु.१४,६२,५७०/- (अक्षरी र.रु.चौदा लाख बासष्ठ हजार पाचशे सत्तर फक्त) चे खर्चास मान्यता व पुरवठादार मे. जोशी बंधू केटरर्स यांचेबरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५२५ विषय क्रमांक- ०३
दिनांक- २७/१०/२०२१ विभाग- मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.अभिषेक बारणे अनुमोदक- मा.कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा.अति. आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मभां/१५/कावि/२२६/२०२१, दि.१८/१०/२०२१.

मा.अति. आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे

भारतीय साथरोग अधिनियम १८९७, सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना दि.१४/०३/२०२० आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ कलम (४१ व ५०), महानगरपालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३) (क) नुसार कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मनपामार्फत स्थापन केलेल्या Covid Care Center व Institutional Quarantine Center येथील रुग्ण तसेच नियुक्त केलेले कर्मचारी यांना गरजेनुसार जेवण व नाष्टा उपलब्ध करुन देणेकामी ई निविदा सूचना क्रमांक १०/२०२०-२१ अन्वये प्राप्त झालेला लघुत्तम दर रुपये १८०/- प्रति दिन प्रति व्यक्ति यानुसार एकूण १५ पुरवठादार निश्चित करणेत आलेले आहेत. त्यानुषंगाने निर्गत करणेत आलेल्या पुरवठा आदेशानुसार दि.१८/०४/२१ अखेर र.रु.१८०/- प्रतिदिन प्रति व्यक्ति व दि.१९/०४/२१ पासून रुपये २३०/- प्रति दिन प्रति व्यक्ती याप्रमाणे सबंधित पुरवठादारांनी प्रति दिन दुपारचे/रात्रीचे यापैकी ज्या वेळेस कमाल जेवणाचा पुरवठा केलेला आहे त्यानुसार सबंधित कोविड केअर सेंटरचे पाक्षिक अहवाल विचारात घेऊन विषयाच्यास विस्तर तपशिलामध्ये नमुद केलेल्या कालावधी मध्ये होणा-या रुपये ३४,०३,०८०/- (अक्षरी रुपये– चौतीस लाख तीन हजार एंन्शी फक्त) चे खर्चास मान्यता व पुरवठादार मे. सावित्री महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या. यांचे बरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५२६ विषय क्रमांक- ०४
दिनांक- २७/१०/२०२१ विभाग- बी.आर.टी.एस. स्थापत्य
सुचक- मा.अभिषेक बारणे अनुमोदक- मा.कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा.आयुक्तसो यांचे पत्र क्र.बीआरटीएस/१३१८/२०२१, दि.१४/१०/२०२१.

मा.आयुक्तसो यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी –चिंचवड शहराची वाढलेली लोक संख्या व झपाट्याने होणारा विकास यामुळे शहरामध्ये होणारी गर्दी, वाहतूक नियमन व नियंत्रण इ .बाबी विचारात घेऊन ऑगस्ट २०१८ साली

महाराष्ट्र शासनाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका व बाजूच्या परिसरासाठी स्वतंत्र पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त कार्यालय सुरु केलेले आहे. शहरांमध्ये आणि शहरालगतच्या हिंजवडी, चाकण, तळेगाव येथे आयटी कंपनी, ऑटो मोबाईल कंपनी व इतर औद्योगिक वसाहतीमुळे प्रचंड मोठ्या प्रमाणात नागरी वस्ती वाढलेली आहे. त्यासोबतच वाहतूक कोंडी, गुन्हेगारी व चो-या असे प्रकार ही वाढत आहे. अशा छोट्या-मोठ्या गुन्हेगारांवर वचक ठेवण्यासाठी पोलिस पेट्रोलिंगची आवश्यकता असून त्याकरिता मोटरसायकल हे एक प्रभावी साधन आहे. मोटर सायकलने पोलीस कर्मचारी तातडीने कमीत कमी वेळात अरुंद गल्ली बोळ, झोपडपट्टी आदी ठिकाणी पोहोचण्यास मदत होणार आहे . त्यामुळे मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड शहर यांनी पत्रान्वये पोलिस पेट्रोलिंगकरिता १०० Pulsar 150 DTSI स्मार्ट बाईक्सच्या सोबत 2 Mike, Siren, Blinkers/Flash lights, Camera, GPS Tracking System, Jammer Holders, Helmet with Helmet Holder etc. Special Fitments ची मागणी दि. ११/०८/२०२१ रोजी मनपाकडे केलेली आहे. पोलिस आयुक्त पिंपरी चिंचवड शहर यांचेकरीता पोलिस पेट्रोलिंगसाठी ५० मोटार सायकल GeM Portal च्या E-Stores मधुन त्यावेळीच्या दराने खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे. दि. ०४/१०/२०२१ रोजीच्या महाराष्ट्र शासनाच्या GeM Portal वरील E-Stores वर Bajaj Pulsar 150 DTSI मोटार सायकलचा दर ९४,८५०/- इतका आहे. त्यानुसार ५० मोटार सायकल खरेदी कामी सुमारे ४७,४२,४००/- इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच पोलिस आयुक्त, पिंपरी चिंचवड शहर कार्यालयाकरीता ५० मोटार सायकल शासनाच्या E-Stores मधुन खरेदी करणेचा खर्च कोविड -१९ या साथरोगाच्या कालावधी मध्ये मनपा व शहर पोलिसांच्या संयुक्त मोहिमे मार्फत मास्क न वापरणा-या, विनापरवाना अनावश्यक फिरणा-या नागरिकांकडुन वसुल करणेत आलेल्या दंडात्मक शुल्कामुळे जमा झालेल्या निधीतुन सुमारे र.रु. २.३४ कोटी मधुन खरेदी करण्याचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५२७ विषय क्रमांक- ०५

दिनांक- २७/१०/२०२१ विभाग- विद्युत क क्षेत्रिय

सुचक- मा.अभिषेक बारणे अनुमोदक- मा.कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा.अति. आयुक्त(१) यांचे पत्र क्र.कक्षेका/वि/जा/५९९/२०२१, दि.१४/१०/२०२१.

मा.अति. आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामधे कोरोना वीषाणूचा प्रादूर्भाव रोखणेसाठी, पिंपरी चिंचवड शहरामधे कामानिमित्त किंवा नातेवाईकांकडे आलेले परदेशी नागरिक यांना १४ दिवस देखरेखीखाली (Quarantine) ठेवणे करिता तसेच कोविड केअर सेंटर करिता पिं.चिं.म.न.पा. ने मोशी प्राधिकरण येथील मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह इमारत दि. २०/०३/२०२० पासून ताब्यात घेणेत आलेली आहे. सदरचे इमारतीचा वीजमीटर मुलींचे वसतिगृह, प्लॉट- १, सेक्टर-४, मोशी यांचे नावे आहे. तरी सदर इमारतीचा वापर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कोविड केअर सेंटर करीता केलेला आहे. सदर इमारतीचे माहे मे २०२१ ते ऑगस्ट २०२१ पर्यंतचे र.रु.४९,०१०/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास हजार दहा फक्त) इतके वीज बील

मनपामार्फत अदा करणे आवश्यक आहे. तसेच वसतिगृहाचा वीजपुरवठा खंडीत होउ नये याकरीता सदरचे वीज बील म.रा.वि.वि.कं.लि. यांस अदा करणे क्रम प्राप्त व आवश्यक आहे.सदर वीजबील भरणे करीताचे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५२८ विषय क्रमांक- ०६

दिनांक- २७/१०/२०२१ विभाग- विद्युत क क्षेत्रिय

सुचक- मा.अभिषेक बारणे अनुमोदक- मा.कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा.अति. आयुक्त(१) यांचे पत्र क्र.कक्षेका/वि/जा/६००/२०२१, दि.१४/१०/२०२१.

मा.अति. आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे

विषय क्र.६) पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कोरोना वीषाणूचा प्रादूर्भाव रोखणेसाठी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, 'क' क्षेत्रिय कार्यालयामार्फत गवळी माथा येथील क्वालिटी सर्कल फोरम ऑफ इंडिया, भोसरी येथे कोविड-१९ लसीकरण व तपासणी केंद्र दि.२०/०४/२०२१ पासून सुरु करणेत आलेले आहे. सदर इमारती मधील विद्युत यंत्रणा, संबंधीत देखभाल दुरुस्ती, वीजबील, जनित्रसंच डिझेल याबाबतचे कामकाज करणेबाबत मा. क्षेत्रिय अधिकारी, 'क' क्षेत्रिय कार्यालय यांनी या विभागास कळविले आहे. सदरचे इमारतीचा वीज मीटर "द चेअरमन क्वालिटी सर्कल टेक ट्रेनिंग, J/P-10 MIDC" यांचे नावे आहे. सदर इमारतीचा वापर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कोविड-१९ लसीकरण केंद्र व तपासणी केंद्राकरीता केलेला आहे. सदर इमारतीचे माहे सप्टेंबर २०२१ चे र.रु.२४,५७०/- (अक्षरी र.रु.चोवीस हजार पाचशे सत्तर फक्त) इतके वीजबील मनपामार्फत अदा करणे आवश्यक आहे. तसेच सदर इमारतीचा वीजपुरवठा खंडीत होउ नये याकरीता सदरचे वीज बील म.रा.वि.वि.कं.लि. यांस अदा करणे क्रम प्राप्त व आवश्यक आहे.सदर वीज बीलभरणे करीताचे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५२९ विषय क्रमांक- ०७

दिनांक- २७/१०/२०२१ विभाग- वाय.सी.एम.एच.

सुचक- मा.अभिषेक बारणे अनुमोदक- मा.कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा.आयुक्तसो यांचे पत्र क्र.वायसीएमएच/७/कावि/१२७४/२०२१, दि.०६/१०/२०२१.

मा.आयुक्तसो यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाचे पदव्युत्तर संस्था य. च. स्मृती रूग्णालयाकरीता अस्थायी स्वरूपातील वरिष्ठ निवासी, कनिष्ठ निवासी, वैद्यकिय अधिकारी शिफ्ट ड्युटी डॉक्टरांच्या रिक्त पदांकरीता दि.१३/०९/२०२१ व दि.२०/०९/२०२१ रोजी Walk In Interview करीता उपस्थीत उमेदवारांमधुन वरिष्ठ निवासी-७, कनिष्ठ निवासी-२४ व शिफ्ट ड्युटी-१ असे एकूण-३२ उमेदवारांची निवड करणेस शिफारस केलेली आहे. त्यानुसार सोबतचे प्रपत्र अ मध्ये नमुद केलेल्या वरिष्ठ निवासी-७, कनिष्ठ निवासी-२४ व शिफ्ट ड्युटी-१ या उमेदवारांची दरमहा एकत्रित

मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात आदेशाचे तारखेपासून नियुक्ती करणे व त्याकामी प्रत्यक्ष येणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५३० विषय क्रमांक- ०८

दिनांक- २७/१०/२०२१ विभाग- वाय.सी.एम.एच.

सुचक- मा.अभिषेक बारणे अनुमोदक- मा.कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा.आयुक्तसो यांचे पत्र क्र.वायसीएमएच/७/कावि/१२३०/२०२१, दि.२२/०९/२०२१.

मा.आयुक्तसो यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाचे पदव्युत्तर संस्था य. च. स्मृती रूग्णालयाकरीता अस्थायी स्वरूपातील वरिष्ठ निवासी, कनिष्ठ निवासी, वैद्यकिय अधिकारी शिफ्ट ड्युटी डॉक्टरांच्या रिक्त पदांकरीता दि. २३/०८/२०२१, दि. ३०/०८/२०२१ व दि.०६/०९/२०२१ रोजी Walk In Interview करीता उपस्थीत उमेदवारांमधुन वरिष्ठ निवासी- ५ व कनिष्ठ निवासी - १० असे एकूण-१५ उमेदवारांची निवड करणेस शिफारस केलेली आहे. त्यानुसार सोबतचे प्रपत्र अ मध्ये नमुद केलेल्या वरिष्ठ निवासी-५ व कनिष्ठ निवासी - १० या उमेदवारांची दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात आदेशाचे तारखेपासून नियुक्ती करणे व त्याकामी प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५३१ विषय क्रमांक- ०९

दिनांक- २७/१०/२०२१ विभाग- वाय.सी.एम.एच.

सुचक- मा.अभिषेक बारणे अनुमोदक- मा.कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा.आयुक्तसो यांचे पत्र क्र.वायसीएमएच/७/कावि/११९४/२०२१, दि.२१/०९/२०२१.

मा.आयुक्तसो यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयामध्ये तात्पुरत्या स्वारूपात मानधनावर नेमणुक केलेल्या विविध पदावर कार्यरत असलेल्या लॅब टेक्निशियन-६, फार्मासिस्ट-१, डाटाएंट्री ऑपरेटर-१, पुरूषकक्ष मदतनीस-१० व स्त्रीकक्ष मदतनीस-१२ असे एकूण-३० उमेदवारांचा नियुक्ती कालावधी दि.१७/०९/२०२१ रोजी संपुष्टात येत आहे. सध्यस्थितीत संपुर्ण देशात/राज्यात/शहारात कोरोना -१९ या संसर्गजन्य विषाणुचा वाढता प्रादुर्भाव व त्यामुळे कोरोना बाधीत रूग्णांची वाढती संख्या विचारात घेता तात्पुरत्या स्वरूपात यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयामध्ये कोविड-१९ चे कामकाज केलेल्या व दि.१७/०९/२०२१ अखेर कार्यरत असलेल्या मानधनावरील विविध पदावरील-३० उमेदवारांची सेवा वैद्यकिय मुख्य कार्यालयाकडील आदेश क्र. वैद्य/१७/कावि/१०८६/२०२१ दि.१५/०९/२०२१ चे आदेशास अधिन राहून एक महिन्या करीता अधिग्रहित करणेकामी कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५३२ विषय क्रमांक- १०

दिनांक- २७/१०/२०२१ विभाग- उद्यान

सुचक- मा.अभिषेक बारणे अनुमोदक- मा.कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा.अति. आयुक्त(१) यांचे पत्र क्र.उद्यान/२/कावि/६२२/२०२१, दि.२०/१०/२०२१.

मा.अति. आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे

मनपाचे उद्यान विभागामार्फत निविदाद्वारे उद्यान देखभाल संरक्षण काम करारनामा करून वेळोवेळी कामकाज करून आदेश देऊन कामे करून घेणेत येतात.सदरचा कालावधी दोन वर्षाचा असतो. कामकाजाच्या सोईच्या दृष्टिने सर्व उद्यानांची देखभाल कामाची निविदा एकाच वेळी दोन वर्ष कालावधीसाठी क्षेत्रीय कार्यालयानुसार निविदा प्रस्तावीत करणेत आलेल्या होत्या यामध्ये मोठी उद्याने वगळुन उर्वरीत ११५ उद्यानांसाठी साधारण २३ निविदा व रस्ते सुशोभिकरण देखभालीसाठी ९ निविदा प्रस्तावित करणेत आल्या होत्या. कोरोणा विषाणुच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे कर्मचारी उपस्थीतीवर निर्बंध असल्यामुळे व काही निविदा कोर्टामध्ये असल्यामुळे विलंब झाला आहे.सदरच्या निविदा कार्यवाही पुर्ण झालेली आहे. तथापी प्रस्तावात नमुद केलेल्या उद्यान कामाची मुदत साधारण सप्टेंबर २०२१ मध्ये संपलेली आहे. देखभाल कामात खंड पडून देता येत नाही. सोबतचे प्रपत्र अ मधील १ ते १५ उद्याने/रस्ते देखभाल कालावधी सप्टेंबर २०२१ पर्यंत मूदत असून काही निविदा कोर्टामध्ये असल्यामुळे विलंब झाला आहे. सध्या कोर्टाचा निकाल आलेला असुन पुढील कार्यवाही करणेकामी डिसेंबर २०२१ अखेर मुदतवाढ देणे आवश्यक असून त्याप्रमाणे प्रपत्र अ नुसार येणारे र.रु.८३,७२,१५८/- (अक्षरी र.रु.त्र्याऐंशी लाख बाहत्तर हजार एकशे अठ्ठावन्न फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५३३ विषय क्रमांक- ११

दिनांक- २७/१०/२०२१ विभाग- स्थापत्य इ मुख्यालय

सुचक- मा.बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/इ-मुख्य/४९४/२०२१, दि.२०/१०/२०२१.

विषय- प्रभाग क्र.३मधील इत्यादी ठिकाणचे पेव्हिंग ब्लॉक बसविणे व दुरूस्ती करणे.

विषय क्र.११ चा विचार पुढील सभेच्या वेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५३४ विषय क्रमांक- १२

दिनांक- २७/१०/२०२१ विभाग- स्थापत्य इ मुख्यालय

सुचक- मा.बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/इ-मुख्य/४९५/२०२१, दि.२०/१०/२०२१.

विषय- प्रभाग क्र.५ येथील इत्यादी ठिकाणी खडीमुरुम व बीबीएम पध्दतीने रस्त्यांची दुरुस्ती करणे.

विषय क्र.१२ चा विचार पुढील सभेच्या वेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५३५ विषय क्रमांक- १३

दिनांक- २७/१०/२०२१ विभाग- स्थापत्य ह मुख्यालय

सुचक- मा.बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.आयुक्तसो यांचे पत्र क्र.स्था/नि/ह-मुख्य/९१८/२०२१, दि.२०/१०/२०२१.

मा.आयुक्तसो यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र. 32/01/2021-22 अन्वये प्रभाग क्र.३१ मध्ये सांगवी पोलीस चौकी ते सांगवी फाटा रस्ता UTWT पध्दतीने करणे. कामी मे.साईप्रभा कन्स्ट्रक्शन नि.र.रू.8,25,34,610/- (अक्षरी रक्कम रुपये आठ कोटी पंचवीस लाख चौतीस हजार सहाशे दहा फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.8,16,16,010/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.8,16,16,010/- पेक्षा 27.96% कमी म्हणजेच र.रु.5,87,96,174/- +रॉयल्टी चार्जेस र.रु.4,27,339/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.9,18,600/- = एकुण र.रु.6,01,42,113/- (अक्षरी र.रु.सहा कोटी एक लाख बेचाळीस हजार एकशे तेरा फक्त) पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/ घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५३६ विषय क्रमांक- १४

दिनांक- २७/१०/२०२१ विभाग- ह क्षेत्रिय आरोग्य

सुचक- मा.बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.अति. आयुक्त(१) यांचे पत्र क्र.हक्षे/ /कावि/२४६/२०२१, दि.२०/१०/२०२१.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ह क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील आरोग्य विभागाचे अंतर्गत प्रभाग क्रं २०,३०,३१ व ३२ प्रभागसाठी १३२८ सार्वजनिक शौचालय व मुता-यांची यांत्रिक पध्दतीने( पाण्याचे उच्चदाबाचे सहाय्याने) व मनुष्यबळाद्वारे दैनंदिन साफसफाई, देखभाल व किरकोळ दुरुस्ती करणे.

विषय क्र.१४ चा विचार पुढील सभेच्या वेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५३७ विषय क्रमांक- १५

दिनांक- २७/१०/२०२१ विभाग- वाय.सी.एम.एच.

सुचक- मा.बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.आयुक्तसो यांचे पत्र क्र.वायसीएमएच/फार्मा/स्टो/कावि/१५७/२०२१, दि.२०/१०/२०२१.

विषय- तातडीने आवश्यक असलेल्या औषधे/ साहित्य पुरवठ्याकामी ई-निविदा क्र.१/२०१९-२०, दि.२६/०६/२०१९ चे अनुषंगाने होणा-या र.रु.सहा कोटी चे वाढीव खर्चाबाबत.

विषय क्र.१५ चा विचार पुढील सभेच्या वेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५३८ विषय क्रमांक- १६

दिनांक- २७/१०/२०२१ विभाग- पाणीपुरवठा

सुचक- मा.बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.पापु/८/कावि/३९३/२०२१, दि.१३/१०/२०२१.
मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र “अ” (१ ते १) मधील निविदा कामांचे अवलोकनहोवुन नियमानुसार व निविदा अटीशर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलमानुसार भाववाढ देय असल्यास मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्येझालेली वाढ/ घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५३९ विषय क्रमांक- १७

दिनांक- २७/१०/२०२१ विभाग- नागरवस्ती विकास योजना

सुचक- मा.बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.आयुक्तसो यांचे पत्र क्र.नावियो/१/कावि/७७९/२०२१, दि.२०/१०/२०२१.

मा.आयुक्तसो यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिला व बाल कल्याण , मागासवर्गीय कल्याणकारी, दिव्यांग कल्याणकारी व इतर कल्याणकारी या ४ मुख्य योजनाअंतर्गत विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात.या योजनांतर्गत आलेल्या विविध अर्जांची तपासणी करणे, अर्जांची डेटा एंट्री करणे, महापालिकेच्या विविध योजनांचा वस्तीपातळीवर प्रचार व प्रसार करणे, बचतगट निर्माण करणे, त्यांचे संगोपन करणे, अनुदान मिळवून देणे, व्यवसायासाठी मार्गदर्शन करुन कर्ज मिळवुन देणे या सर्व कामकाजासाठी प्रभावीपणे अंमलबजावणी करणेकामी समूह संघटनांची तात्पुरत्या स्वरूपात मानधन तत्वावर सहा महिने कालावधीसाठी नेमणूक करण्यात येते.नागरवस्ती विभागातील कामकाजासाठी शासनाने दिलेल्या निर्देशानुसार लेखी परीक्षा घेण्यात येऊन प्रशासन विभागाने दिलेल्या आरक्षणानुसार समूह संघटक पदे भरणे बाबत आदेश निर्गमित करण्यात आलेले होते. त्यानुसार लेखी परिक्षा घेऊन सदर 20 समूह संघटक पदांपैकी फक्त 14 समूह संघटक रुजू झालेअसून त्यांना मा. अति. आयुक्त यांचेकडील आदेश क्र.नावियो/१/कावि/२९६/२०२१ दि.०५/०४/२०२१ अन्वये आदेशाचे दिनांकापासून ते दि.०४/१०/२०२१ या कालावधीपर्यंत किंवा नवीन नियुक्त्या होईपर्यंतचा कालावधी यामधील जो कमी असेल तोपर्यंत हमीपत्र घेऊन आदेशातील नमूद अटी शर्तीनुसार व दरमहा र.रु.१९४९५/- + वाहन भत्ता र.रु.१३००/- असे एकुण र.रु.२०,७९५/- इतक्या एकत्रित मानधनावर भरण्यात आले आहेत. सदर 14 समूह संघटक यांची मुदत दिनांक 04/10/2021रोजी संपुष्टात येतआहे. तरी उपरोक्त 14 समुह संघटकांना काही दिवस सेवाकालावधी खंडीत करुन कामाची व्याप्ती आणि निकड लक्षात घेता आदेशाचे दिनांकापासून ३ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देणे. तसेच नियुक्ती आदेशातील 15 समूह संघटकांपैकी इतर मागासवर्गीय प्रवर्गातील 1 उमेदवार कामावर रुजू न झाल्याने त्याच प्रवर्गाच्या प्रतिक्षा यादीतील पहिल्या क्रमांकाच्या उमेदवार श्रीम. शुभांगी मस्कर यांना तीन महिने कालावधीसाठी नेमणुक देऊन अशा एकुण 15 समुह संघटकांना प्रति समूह संघटक एकत्रित मानधन (मा. कामगार कल्याण अधिकारी, कामगार कल्याण विभाग यांनी सेवा देणा-या सर्व कामगारांना किमान वेतन अधिनियमातील तरतुदीनुसार व कामाचे स्वरुपानुसार पत्र क्र.काक/३/कावि/२२२/२०२१ दि.१०/०८/२०२१ अन्वये दि.०१/०७/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ प्रसिध्द दराप्रमाणे) दरमहा र.रु.२०१६०/- + १३००/- = २१४६०/- देण्यास, त्यांचे समवेत करारनामा करुन त्यांना मुदतवाढ नियुक्तीपत्र देणे व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५४०
विषय क्रमांक- १८
दिनांक- २७/१०/२०२१
विभाग- स्थापत्य BSUP प्रकल्प
सुचक- मा.बुर्डे सुवर्णा
अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.आयुक्तसो यांचे पत्र क्र.स्था/BSUPप्र/४९५/२०२१, दि.२१/१०/२०२१.

विषय- स्थापत्य EWS प्रकल्प विभागांतर्गत स्थापत्य विशेष योजना या लेखाशिर्षांतर्गत तरतुदीमध्ये वाढ / घट करणेबाबत.

विषय क्र.१८ चा विचार पुढील सभेच्या वेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५४१
विषय क्रमांक- १९
दिनांक- २७/१०/२०२१
विभाग- पाणीपुरवठा
सुचक- मा.बुर्डे सुवर्णा
अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.आयुक्तसो यांचे पत्र क्र.पापु/१९६/२४४७/२०२१, दि.२१/१०/२०२१.

मा.आयुक्तसो यांनी शिफारस केले प्रमाणे

केंद्रशासनाच्या AMRUT MISSION अंतर्गत पिंपरी चिंचवड शहराच्या ६०% भागामध्ये हिशोबबाह्य पाण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी तसेच समन्यायी पाणी वाटपासाठी शासनाकडून SAAP-1 आणि SAAP-2 अंतर्गत अनुक्रमे र.रु.११८.८४ व १२५.२० कोटीची कामे करण्यासाठी मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार महानगरपालिकेने SAAP-1 आणि SAAP-2 मध्ये ४ टेंडर पॅकेजमध्ये कामे काढली आहेत. तदनुसार SAAP व SAAP-2 अंतर्गत चार वेगवेगळ्या ठेकेदार यांच्यामार्फत विविध कामे करणेत येत आहेत. सदरच्या कामाचा DPR हा सन २०१२-१३ मध्ये बनविला होता व त्यानंतर गेल्या ५-६ वर्षात महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये वाढत्या लोकसंख्येमुळे वाढ झालेली आहे. त्यामुळे सदरचा DPR व पाणीपुरवठा यंत्रणेमध्ये सुधारणा करण्यासाठी तज्ञ सल्लागार मे.DRA Consultant Ltd. यांची Design & Network अद्यावत करणेसाठी दि.०९/०५/२०१८ रोजी नेमणूक करणेत आली होती. अमृत योजने अंतर्गत चारही टेंडर पॅकेजेसमधील सुधारीत कामे ही सल्लागाराच्या Hydraulic Modelling आणि सुधारीत Design & Drawings (SIP रिपोर्ट) प्रमाणे प्रगतीपथावर आहेत. सदरच्या सल्लागाराची कामाची मुदत ही दि.३०/०५/२०२१ रोजी संपत आहे. सल्लागाराने दि.३१/०५/२०२३ (२४ महीने) पर्यंतची मुदतवाढीची विनंती केली आहे. वरील सर्व बाबी विचारात घेता, सल्लागाराचे Part-1 व Part २ अंतर्गत असलेली कामे आणि सर्विसेस पूर्ण करण्यासाठी होणारा विलंब तसेच यासाठी लागणाऱ्या अधिकच्या कालावधी कामी सल्लागारांनी केलेली मुदतवाढीची मागणी काम पूर्ण होणेचे दृष्टीने सकारात्मक असलेचे निदर्शनास येत आहे. तसेच अमृत योजने अंतर्गत चालू असलेली कामे विविध अडचणींमुळे पूर्ण करण्यास होणारा विलंब व सध्याची कोरोना महामारी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता शासना मार्फत लावण्यात आलेले निर्बंध लक्षात घेता, अमृत योजने अंतर्गत सुरु असलेली कामे करण्यासाठी मुदतवाढ दयावी लागेल असे दिसून येत आहे.सध्या चारही ठेकेदारांना शिल्लक कामे पूर्ण करण्या करिता अधिकचा ६ ते १० महिन्याचा वेळ लागणार आहे. यास अनुसरून

सल्लागाराची Project Management Consultancy (PMC) सर्व्हिसेसचा कालावधी जो वरील चारही पॅकेजेसमधील कामाशी निगडीत आहे, ची मुदतवाढ ३१/०५/२०२३ पर्यंत करणे गरजेचे आहे. तसेच चारही ठेकेदरांचे Final Bill, Project Ccommissioning, Handing Overइ. कामासाठी देखील अधिकचा वेळ लागणार आहे.या पार्श्वभूमीवर सल्लागाराचे Part-1 व Part-2 च्या कामाची मुदत ही,आहे त्या टेंडर अटी-शर्तीनुसार दि. ३१/०५/२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यास हरकत नसावी असे वाटते. सोबतच महानगरपालिकेच्या अंतर्गत तरतुदींमधून ८ नवीन जलकुंभ उभारणेचे काम सध्या प्रगतीपथावर असून सदर काम देखील वर नमूद केल्याप्रमाणे कोरोना महामारीच्या निर्बंधांमुळे प्रभावित झालेले आहे, तरी सदर कामांसाठी लागणा-या तांत्रिक मनुष्यबळ पुराविण्यासाठीचे देयक अमृत योजनेसाठी तांत्रिक मनुष्यबळ पुरविण्याच्या देयाकांमधून अदा करण्यात येते. त्यामुळे सदर प्रकल्पाच्या चारही निविदेअंतर्गत व महानगरपालिकेच्या अंतर्गत चालू असणारी कामे व व्याप लक्षात घेता ,Project Management Consultancy (PMC) सर्व्हिसेसच्या कामाच्या निविदा रकमेच्या होणाऱ्या वाढीव खर्चास ( कामाच्या रकमेच्या आदेशा पेक्षा अंदाजे र.रु.२,००,००,०००/- जादा) खालील प्रमाणे मान्यता मिळणे आवश्यक आहे.

1. सल्लागाराचे Part-1 व Part-2 कामाच्या अंतर्गत असलेली कामे करून घेण्यास, आहे त्या निविदा अटी व शर्ती नुसार दि.३१ /०५ /२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच

2. सल्लागाराचे Part-1 व Part-2 सर्विसेंसच्या कामाच्या निविदा रकमेच्या होणाऱ्या वाढीव खर्चास कामाच्या रकमेच्या अदेशा पेक्षा अंदाजे र.रु.२,००,००,०००/- जादा यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५४२ विषय क्रमांक- २०

दिनांक- २७/१०/२०२१ विभाग- मध्यवर्ती भांडार

सुचक- मा.बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.आयुक्तसो यांचे पत्र क्र.मभां/१६/कावि/४४६/२०२१, दि.२०/१०/२०२१.

मा.आयुक्तसो यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाचे वैद्यकीय विभागाकडील नविन भोसरी, जिजामाता, थेरगाव व आकुर्डी रुग्णालय येथे मेडीकल गॅस पाईप लाईन बसविणेबाबत (Turn Key Project) तांत्रिक स्पेसिफिकेशननुसार स्थापन आणि कार्यान्वय याबाबत आवश्यकतेनुसार पर्यवेक्षण करुन तांत्रिक लेखापरिक्षण शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे (COEP) यांचेकडुन करुन घेणेसाठी शासन निर्णयानुसार त्रयस्थ संस्थेमार्फत लेखापरीक्षणाच्या फी दरानुसार (कामाच्या किंमतीच्या प्रमाणात) येणा-या तांत्रिक लेखापरिक्षण फी र.रु.16,58,230/- (अक्षरी र.रु.सोळा लाख अठ्ठावण्ण हजार दोनशे तीस फक्त) ही शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे- 05 (COEP) यांना अदा करणेसाठी चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५४३ विषय क्रमांक- २१

दिनांक- २७/१०/२०२१ विभाग- मध्यवर्ती भांडार

सुचक- मा.संतोष कांबळे अनुमोदक- मा.सुजाता पालांडे

संदर्भ- मा.आयुक्तसो यांचे पत्र क्र.मभां/१६/कावि/४४५/२०२१, दि.२०/१०/२०२१.

विषय- कोरोना-19 अनुषंगाने वाय.सी.एम. रुग्णालयांतील NICU, PICU पेडिएट्रिक वॉर्डकरीता आवश्यक साहित्य Bubble CPAP with Accessories उपकरण खरेदीबाबत.

विषय क्र.२१ चा विचार पुढील सभेच्या वेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५४४ विषय क्रमांक- २२

दिनांक- २७/१०/२०२१

सुचक- मा.संतोष कांबळे अनुमोदक- मा.सुजाता पालांडे

संदर्भ- १) मा.उप आयुक्त यांचे पत्र क्र.नाावियो/२/कावि/५६/२०२१ दि.०४/०८/२०२१.

२)मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र.४६ दि.२३/०९/२०२१.

मा. महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र.४६ दिनांक.२३/०९/२०२१ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत मनपा हद्दीतील नागरिकांकरिता विविध कल्याणकारी योजना राबविणेत येतात. त्याअनुषंगाने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे WE-YUVA चॅलेंज स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुषंगाने सदर स्पर्धेची मनपा हद्दीतील मुली/युवती/महिलांमध्ये जास्तीत जास्त प्रसिद्धी व जनजागृती व्हावी जेणेकरुन जास्तीत जास्त स्पर्धकांनी या स्पर्धेमध्ये सहभाग घ्यावा. याकरिता रेडीओ सिटी ९१.१ एफम व रेडिओ मिर्ची ९८.३ एफम या रेडिओ वाहिन्या ऐकणारा महिला प्रेक्षक वर्ग हा जास्त असलेने सदर स्पर्धेचे जाहिरातीचे कामकाज आदेश क्र.नाावियो/०२/कावि/२५/२०२१ दि.२५/०३/२०२१ अन्वये सदरचे दोन रेडिओ वाहिन्यांना देणेत आलेले आहे. सदर कामकाज पुर्ण झालेनंतर दोन्ही संस्थांनी झालेल्या कामकाजाचे बिल सादर केलेले असून ते खालील तक्त्यात नमुद केलेले आहे.

| अ. क्र. | शहर | स्टेशन | दिवस | स्पॉट्स वारंवरता | स्पॉट्स/ जाहिरात कालावधी (सेकंद) | एकुण सेकंद | दर/१० सेकंद | किंमत | एकुण रक्कम (१८% GST) सह |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे | रेडिओ सिटी ९१.१ | १० | १५ | ३० | ४५०० | ४०० | १,८०,०००/- | २,१२,४००/- |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | पुणे | रेडिओ मिर्ची ९८.३ | १० | १५ | ३० | ४५०० | ४०० | १,८०,०००/- | २,१२,४००/- |

WE-YUVA चॅलेंज स्पर्धेची जाहिरातीचे कामकाज रेडिओ सिटी ९१.१ एफम व रेडिओ मिर्ची ९८.३ एफम यांनी सादर केलेल्या दरपत्रकानुसार दि.२४/०३/२०२१ पासून दि.०२/०४/२०२१ पर्यंत (एकूण १० दिवस) तातडीची बाब म्हणुन कामकाज करणेस तसेच सदर जाहिरातीकरीता लागणारी तरतुद महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत येणा-या महिला दिन या उपलेखाशिर्षामधून खर्च करणेस आदेश देणेत आलेला असलेने तातडीची बाब म्हणून राबविलेल्या कामकाजास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५४५ विषय क्रमांक- २३

दिनांक- २७/१०/२०२१

सुचक- मा.संतोष कांबळे अनुमोदक- मा.सुजाता पालांडे

संदर्भ- मा.महिला व बालकल्याण समिती सभा क्र.४७ दिनांक.२३/०९/२०२१.

मा. महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र.४७ दिनांक.२३/०९/२०२१ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिला व बालकल्याण योजने अंतर्गत विविध लोक कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. तरी महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने माहिती घेणे व पाहणी करणे याकामी बेंगलोर येथे महिला व बालकल्याण समिती सदस्यांची अभ्यास सहल आयोजित करणेस येणा-या खर्चास तसेच महिला बालकल्याण समिती व्यतिरिक्त अन्य महिला सदस्यांनी मागणी केल्यास त्यांनाही पाहणी दौ-यास घेवुन जाण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५४६ विषय क्रमांक- २४

दिनांक- २७/१०/२०२१

सुचक- मा.संतोष कांबळे अनुमोदक- मा.सुजाता पालांडे

संदर्भ- मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र.४८ दिनांक.२३/०९/२०२१.

विषय- टॅब खरेदीबाबत.

विषय क्र.२४ दप्तरी दाखल करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५४७ विषय क्रमांक- २५

दिनांक- २७/१०/२०२१

सुचक- मा.संतोष कांबळे अनुमोदक- मा.सुजाता पालांडे

संदर्भ- मा.विधी समिती सभा ठराव क्र.६२ दिनांक ०१/१०/२०२१.

मा.विधी समिती सभा ठराव क्र.६२ दिनांक ०१/१०/२०२१ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका मार्फत मा.विधी समिती सदस्यांना कायदा सुव्यवस्थाची पाहणी करण्याकरिता अभ्यास दौ-याचे आयोजन केले जाते. या अभ्यास दौरा करण्याकरिता सिक्किम या राज्यात कायदा व्यवस्थाची पाहणी करिता मा.विधी समिती सदस्यांचा तसेच संबंधित अधिकारी यांचा सिक्किम या राज्यात अभ्यास दौरा आयोजीत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५४८ विषय क्रमांक- २६

दिनांक- २७/१०/२०२१ विभाग- ग क्षेत्रिय आरोग्य

सुचक- मा.संतोष कांबळे अनुमोदक- मा.सुजाता पालांडे

संदर्भ- मा.सहा. आयुक्त तथा क्षेत्रिय अधिकारी यांचे पत्र क्र.गक्षेका/आ/४/कावि/६५३/२०२१, दि.१८/१०/२०२१.

मा.सहा. आयुक्त तथा क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरापालिकेच्या कार्यक्षेत्रातंर्गत ग क्षेत्रीय कार्यालयातील कार्यक्षेत्रामध्ये फॉगिंग मशिन रिक्षा टेम्पोमध्ये ठेवून औष्णिक धुरीकरण करणेसाठी ग क्षेत्रीय कार्यालयामार्फत निविदा नोटीस क्र. २/२०१९-२०२० दिनांक - १३/१२/२०१९ रोजी र.रु. ८,४८,६४०/- ची निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार मे.संत फॅसिलिटी सर्व्हिसेस प्रा. लि. या संस्थेने एकुण रक्कमेच्या -११.९०%कमी दर सादर केलेने L1 म्हणून या संस्थेला कामाचा आदेश क्र. गक्षेका/आ/४/कावि/२०४/२०२०दिनांक - २०/०३/२०२० अन्वये दिनांक- २३/०३/२०२० ते २२/०३/२०२१ अखेर देण्यात आला आहे. व पहिली मुदतवाढ आदेश क्र.गक्षेका/आ/४/कावि/३४६/२०२१ दि.२९/०४/२०२१ दि.२३/०३/२०२१ ते दि.२२/०६/२०२१ अखेर व दुसरी मुदतवाढ आदेश क्र. क्षेका/आ/४/कावि/६१६/२०२१ दि.३०/०९/२०२१ अन्वये दि.२३/०६/२०२१ ते दि.२२/०९/२०२१ देण्यात आलेला आहे . सदर कामाची मुदत दि.२२/०९/२०२१ रोजी संपुष्टात आलेली आहे. सदर कामाची नविन निविदा प्रसिध्दीची कार्यवाही क्षेत्रीय कार्यालय स्तरावर चालु करणेत आलेली आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सार्वत्रिक निवडणुक कार्यक्रम जाहिर होण्याची शक्यता आहे, व सदरचे काम हे अत्यावश्यक सेवेचे असल्याने मुदतवाढ देणे आवश्यक आहे. तरी औष्णिक धुरीकरणासाठी वाहने भाड्याने घेणेसाठी, दि.२३/०९/२०२१ ते दि.२२/०३/२०२२ अखेर (६ महिने) अथवा नविन निविदा कार्यवाही पूर्ण होऊन आदेश देईपर्यंत, या दोन्ही पैकी जे प्रथम होईल तोपर्यंत, मे.संत फॅसिलिटी सर्व्हिसेस प्रा.लि. यांची ठेकेदार म्हणून

नेमणूक करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजीत पूर्णांकींत खर्च र.रु.४,२६,०००/- (अक्षरी र.रु.चार लाख सहव्वीस हजार फक्त) इतक्या रक्कमेस व सदरची रक्कम ग क्षेत्रीय कार्यालय, आरोग्य विभागाकडील "धुरीकरणासाठी वाहने भाड्याने घेणे" या लेखाशिर्षावर टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५४९ | विषय क्रमांक- २७
दिनांक- २७/१०/२०२१ | विभाग- फ क्षेत्रिय
सुचक- मा.संतोष कांबळे | अनुमोदक- मा.सुजाता पालांडे

संदर्भ- मा.आयुक्तसो यांचे पत्र क्र.फक्षेका/प्रशा/१/कावि/१५८/२०२१, दि.२१/१०/२०२१.

मा.आयुक्तसो यांनी शिफारस केले प्रमाणे

मनपाच्या फ क्षेत्रीय कार्यालय प्रशासन विभागाचे सन २०२१-२२ चे मुळ अंदाजपत्रकामध्ये "एफ आर पी कॅबीन वृत्तपत्र" या लेखाशिर्षावर र.रु.१,१०,०००/- इतकी तरतुद करणेत आली आहे. आजअखेर १,०२,५९०/- इतका खर्च झालेला असुन र.रु.७,४१०/- इतकी तरतुद शिल्लक आहे. मार्च २०२२ अखेर शिल्लक तरतुद वजा जाता र.रु.१,२५,०००/- इतका खर्च अपेक्षित असल्यामुळे सदरची तरतुद अपुरी पडणार आहे. तसेच "वाहन इंधन" या लेखाशिर्षावर र.रु.१,६५,०००/- इतकी तरतुद करणेत आली आहे. आजअखेर र.रु.८७,५००/- इतका खर्च झालेला असुन र.रु.७७५००/- इतकी तरतुद शिल्लक आहे. मार्च २०२२ अखेर शिल्लक तरतुद वजा जाता र.रु.१,००,०००/- इतका खर्च अपेक्षित असल्यामुळे सरदची तरतुद अपुरी पडणार आहे. सन २०२१-२२ " क्षेत्रिय समिती प्रवास खर्च " या लेखाशिर्षावर र.रु.५,५०,०००/- इतकी तरतुद करणेत आलेली आहे. या लेखाशिर्षातून कोणताही खर्च झालेला नसून र.रु.५,५०,०००/- इतकी तरतुद शिल्लक आहे. त्यातून तरतुद वर्ग करणे शक्य आहे. त्यामुळे "क्षेत्रिय समिती प्रवास खर्च" या लेखाशिर्षावरील र.रु.१,२५,०००/- "एफ आर पी कॅबीन वृत्तपत्र" या लेखाशिर्षावर वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करणेस व र.रु.१,००,०००/- इतकी रक्कम फ क्षेत्रिय कार्यालय प्रशासन विभागाकडील "वाहन इंधन" या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५५० | विषय क्रमांक- २८
दिनांक- २७/१०/२०२१ | विभाग- पाणीपुरवठा
सुचक- मा.संतोष कांबळे | अनुमोदक- मा.सुजाता पालांडे

संदर्भ- मा.आयुक्तसो यांचे पत्र क्र.फक्षेका/पापु/५/कावि/६२९/२०२१, दि.२१/१०/२०२१.

विषय- पिंपरी चिंचवड महापालिकेच्या क्षेत्रातील सर्व पाणी मिटर्सच्या नोंदी घेऊन जागेवर देयक अदा करणे या कामाचा कार्यकाल वाढविणेबाबत.

विषय क्र.२८ चा विचार पुढील सभेच्यावेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५५१ विषय क्रमांक- २९

दिनांक- २७/१०/२०२१ विभाग- आरोग्य मुख्य

सुचक- मा.संतोष कांबळे अनुमोदक- मा.सुजाता पालांडे

संदर्भ- मा.आयुक्तसो यांचे पत्र क्र.आमुका/९/कावि/१८९/२०२१, दि.२२/१०/२०२१.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या “अ”, “ब”, “क”, “ड”, “इ”, “फ”, “ग” व “ह” क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते/ गटर्स साफसफाई करणेबाबत.

विषय क्र.२९ चा विचार पुढील सभेच्यावेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५५२ विषय क्रमांक- ३०

दिनांक- २७/१०/२०२१ विभाग- पाणीपुरवठा

सुचक- मा.संतोष कांबळे अनुमोदक- मा.सुजाता पालांडे

संदर्भ- मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.पापु/८/कावि/४०५/२०२१, दि.२१/१०/२०२१.

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.01/08/2021-22 अन्वये प्रभाग क्र.५ व ७ येथील संप पंप हाऊस व टाक्या येथे स्थापत्य विषयक कामे करणे. कामी मे.अंबाजी इन्फ्रास्ट्रक्चर कं. नि. र.रू.3736983/- (सदोतीस लाख छत्तीस हजार नऊशे त्र्याऐंशी फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.3716775/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.3716775/- पेक्षा 29.7% कमी म्हणजेच र.रु.2612893/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.20208/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.2633101/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/ घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५५३ विषय क्रमांक- ३१

दिनांक- २७/१०/२०२१ विभाग- ह क्षेत्रिय स्थापत्य

सुचक- मा.भोईर सुरेश अनुमोदक- मा.संतोष कांबळे

संदर्भ- मा.अति. आयुक्त(१) यांचे पत्र क्र.हक्षेका/स्था/कावि/९१९/२०२१, दि.२२/१०/२०२१.

मा.अति. आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे

मे.अरबाज इंजिनिअरींग अँड सिव्हील कन्स्ट्रक्शन यांचेकडून र.रू.३,०२,३५६/-(बयाणा र.रु.1,00,000/- समायोजनासह) + 18% GST ची रक्कम रू.५४,४२४/- + आयकर र.रु.3,568/-

अशी एकूण रक्कम रू.३,५६,७८०/-एवढी रक्कम मनपा कोषागारात भरून घेऊन दापोडी येथील हुतात्मा भगतसिंग शाळा (भाग-२) या इमारतीमधून प्राप्त होणारे राडा-रोडा, स्ट्रक्चरल स्टील, लोखंड, दरवाजा, खिडक्या, क्रॉक्रीट, वीटा, फरशी, लोखंडी ग्रील, लोखंडी रेलींग, पत्रे, लाकूड, विद्युत वायरींग, विद्युत बटणे व इतर न काढता येणारे साहित्य, इमारत पाडणा-या ठेकेदार मे.अरबाज इंजिनिअरींग अँड सिव्हील कन्स्ट्रक्शन यांना निविदेच्या विहित अटीनुसार इमारत पाडून या इमारतीमधील साहित्य देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५५४ विषय क्रमांक- ३२

दिनांक- २७/१०/२०२१ विभाग- वैद्यकीय

सुचक- मा.भोईर सुरेश अनुमोदक- मा.संतोष कांबळे

संदर्भ- मा.अति. आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/९४१/२०२१, दि.२१/१०/२०२१.

मा.अति. आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे

जंबो कोविड रुग्णालय येथे लागणारा मेडिकल ऑक्सीजन वायू पुरवठाधारक मे.गॅब एन्टरप्राइजेस यांनी जंबो कोविड हॉस्पिटल येथील Certificate Of Safety For Storage Of Compressded Gas in vessel Rulr 33, Rule 2016 (PESOCERTIFICATE) प्रमाणपत्राची मुदत संपत आलेली आहे. तरी सदरचे प्रमाणपत्र लवकरात लवकर नुतनीकरण करुन घेणेकामी कळविले आहे. सदर प्रमाणपत्राची मुदत दि.३०.०९.२०२१ पर्यंत होती. नोडल अधिकारी यांनी त्यांचेकडील पत्र क्र.आ.म.स्टे/कावि/५३९/२०२१ दि.३०.०९.२०२१ रोजी सदर सर्टीफिकेट नुतनीकरण करणे बाबत कळविले आहे. या संदर्भात कोणती एजन्सी काम करत आहे याची माहिती घेऊन तात्काळ कार्यवाही करणेकामी सूचना देण्यात आल्या. या कामी मे.जेस आयडीया यांचेशी चर्चा केली असता सदर काम मे.सेफटेक रिलायबल असो.प्रा.ली. यांचे मार्फत करण्यात येते असे कळविले त्या प्रमाणे त्यांचे कडुन श्री. देशमुख यांचेशी चर्चा करुन सदर सर्टीफिकेट नुतनीकरण करणे बाबतच्या खर्चाचे कोटेशन मागविणेत आले या कामी सर्व करांसहीत एकूण र.रु.१,०६,०५०/- खर्च येणार आहे या मध्ये नुतनीकरण फि र.रु.५०,०००/- आहे. आणि र.रु.५६,०५०/- सर्व कागदपत्रांची पूर्तता करणे, लायसन्स नुतनीकरण करणे इ. त्यांना सांगीतले नंतर सदर सर्टीफिकेट तातडीने नुतनीकरण करणेकामी त्यांनी तयारी दर्शवली आणि त्या प्रमाणे सदर सर्टीफिकेट दि.३०.०९.२०२१ रोजी मुदतीत नुतनीकरण करुन घेणेत आले आहे. सबब, कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयम येथील जंबो कोविड रुग्णालयातील गॅस संदर्भातील PESCO Certificate नुतनीकरण करणेकामी M/s. Safetech Reliable Associates (OPC) Pvt. Ltd. यांचे कडुन थेट पध्दतीने अपवादात्मक परिस्थितीत अति तातडीचे काम असल्याने करुन घेणेत आले आहे. या कामी आलेल्या एकूण खर्च र.रु.१,०६,०५०/- (अक्षरी र.रु.एक लाख सहा हजार पन्नास फक्त) (सर्व करांसहीत) सदर खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५५५ विषय क्रमांक- ३३

दिनांक- २७/१०/२०२१

सुचक- मा.भोईर सुरेश अनुमोदक- मा.संतोष कांबळे

संदर्भ- मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र.४९ दि.१४/१०/२०२१.

विषय- बालवाडी वर्गातील लहान विद्यार्थ्यांकरिता खेळणी पुरविणेबाबत.

विषय क्र.३३ चा विचार पुढील सभेच्यावेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५५६ विषय क्रमांक- ३४

दिनांक- २७/१०/२०२१

सुचक- मा.भोईर सुरेश अनुमोदक- मा.संतोष कांबळे

संदर्भ- मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र.५० दि.१४/१०/२०२१.

विषय क्र.३४ चा विचार पुढील सभेच्यावेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०५५७ विषय क्रमांक- ३५

दिनांक- २७/१०/२०२१ विभाग- मुख्य लेखा परिक्षण

सुचक- मा.भोईर सुरेश अनुमोदक- मा.संतोष कांबळे

संदर्भ- मा.आयुक्तसो यांचे पत्र क्र.मुलेप/१/कावि/१३८/२०२१, दि.२१/०९/२०२१.

मा.आयुक्तसो यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य लेखापरीक्षण विभागामार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १०५ व १०६ मधील तरतुदींनुसार लेखापरीक्षणाचे कामकाज केले जात असते. सद्यस्थितीत या कार्यालयामार्फत सन २०१० ते २०१८ या कालावधीतील विविध विभागांचे लेखापरीक्षण कामकाज केले जात आहे. तथापि माहे मार्च २०२० पासुन उद्भवलेल्या कोवीड या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव तसेच मनुष्यबळाच्या कमतरते अभावी लेखापरीक्षणाचे कामकाज मागे राहिलेले आहे. त्याचप्रमाणे महापालिकेच्या लेखापरीक्षण विभागातील प्रचलित पध्दतीनुसार सर्व कार्यालयांचे १०० टक्के लेखापरीक्षण करणेत येत असल्याने व महापालिकेच्या कामकाजाचा वाढता व्याप विचारात घेता लेखापरीक्षणाचे कामकाजामध्ये देखील वाढ झालेली आहे. सद्यस्थितीत मुख्यलेखापरीक्षण विभागामार्फत लेखापरीक्षणाचे कामकाज ०६ गटांमार्फत करण्यात येत आहे. सद्यस्थितीत सन २०१५-१८ या आर्थिक वर्षांकरीताचे लेखापरीक्षण सुरु करण्यात आलेले असुन सदरचे कामकाज लवकरात लवकर पुर्ण करण्याचा या कार्यालयाचा प्रयत्न आहे. मुख्य लेखापरीक्षण विभागामार्फत केले जाणारे लेखापरीक्षण कामकाज लवकरात लवकर पुर्ण करण्याच्या दृष्टीने सेवानिवृत्त कर्मचारी व कार्यरत कर्मचारी यांची संयुक्त पथके तयार करुन लेखापरीक्षण कामकाज प्रगतीपथावर नेण्याचे या

कार्यालयाचे प्रयोजन आहे. याकरीता लेखापरीक्षणाचे कामकाज करण्याकरीता तयार असणा-या खालीलप्रमाणे ०५ कर्मचा-यांना पुढील ०६ महिन्याचे कालावधीसाठी लेखापरीक्षणाचे विवक्षित कामकाजाकरीता मुख्य लेखापरीक्षण विभागामध्ये नियुक्ती देणेबाबत प्रस्तावित आहे.

१. श्री.कुलकर्णी मुकूंद बाबुराव, लेखाधिकारी (से.नि.)

२. श्रीम.चौधरी मंगला मोहन, लेखापाल (से.नि.)

३. श्री.मेमाणे राजेंद्र रामचंद्र, उपलेखापाल (से.नि.)

४. श्री.जाधव अविनाश मारुती, मुख्यलिपिक (से.नि.)

५. श्री.कांबळे सुनिल गोविंद, उपलेखापाल (से.नि.)

सबब वरीलप्रमाणे नमूद ०५ सेवानिवृत्त कर्मचा-यांना महापालिकेच्या मुख्य लेखापरीक्षण विभागातील लेखापरीक्षणाचे विवक्षित कामकाजासाठी आदेशाचे तारखेपासुन ६ महिने कालावधीसाठी महाराष्ट्र महापालिका अधिनियमातील कलम ५३(३) नुसार नेमणुक करणे व महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७ डिसेंबर २०१६ नुसार त्यांचे वेतन व भत्ते निश्चित करुन अदा करणेस मान्यता देणेत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड मनपाचे विदयुत विभागातील खालील वीजपर्यवेक्षक (से.नि.) यांस कामकाजाची निकड लक्षात घेऊन ६ महिने मानधनावर नियुक्ती देणेस मान्यता देणेत येत आहे.

1) श्री सुखदेव रामचंद्र साकोरे, वीजपर्यवेक्षक (से.नि.)

2) श्री. नंदकिशोर संतू गायकवाड. वीजपर्यवेक्षक (से.नि.)

3) श्री रमेश दत्तात्रय कंद. वीजपर्यवेक्षक (से.नि.)

4) श्री.प्रकाश केरू घारमाळकर वीजपर्यवेक्षक (से.नि.)

तसेच खालील कनिष्ठ अभियंता (वि) यांसही मानधनावर ६ महिने मानधनावर नियुक्ती देणेस मान्यता देणेत येत आहे.

1) श्री.महेश वसंतराव बेंडे, कनिष्ठ अभियंता(वि) (से.नि.-दि.३१/१०/२०२१)

तसेच यशवंतराव चव्हाण रूग्णालयातील दूरध्वनी कक्षाचे कामकाजासाठी यांसही मानधनावर ६ महिने मानधनावर नियुक्ती देणेस मान्यता देणेत येत आहे.

1) श्री.संजय भास्कर शिरसाठ, दूरध्वनी पर्यवेक्षक (से.नि.)

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जकात/ LBT या विभागाकडील अनेक कंपन्याची तपासणी अद्याप बाकी आहे. त्यासाठी यापुर्वी मनपा सेवेत जकात/ LBT या विभागात काम केलेल्या सेवानिवृत्त कर्मचा-यांस मनपाच्या उत्पन्न वाढीच्या दृष्टीने ६ महिने मानधनावर नियुक्ती देणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

**सभा कामकाजात दाखल करून घेणेत आलेले विषय घेण्यात आले.**

ठराव क्रमांक- १०५५८ विषय क्रमांक- ३६

दिनांक- २७/१०/२०२१ विभाग- लेखा

सुचक- मा.भोईर सुरेश अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/३१/कावि/२००/२०२१, दि.२७/१०/२०२१.

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे कडील पत्र क्रं.पीएमपीएमएल/मुलेविअ/ २६६४, दिनांक १२/१०/२०२१ अन्वये सन २०२०-२१ ची अंदाजीत संचलनतूट र.रु.४९४.१७ कोटी गृहीत धरुन पिं.चिं.म.न.पा.च्या ४०% स्वामित्व हिश्यानुसार संचलन तूटीचा हिस्सा १९७.६७ कोटी नमूद केला असून नोव्हेंबर २०२१ करिता र.रु.१६,४७,००,०००/- दिवाळीपूर्वी संचलनतूटीचे द्यावे अशी विनंती केली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकात पीएमपीएमएल निधी या लेखाशिर्षावर एकूण तरतूद र.रु.२३८.२१ कोटी करणेत आली असून यामध्ये संचलनतूट १६५.७१ कोटी विविध प्रकारचे पासेस र.रु.२.५० कोटी व बसेस खरेदी र.रु.७०.०० कोटी असा अपेक्षीत खर्च गृहीत धरण्यात आलेला आहे. सदर संचलन तूटीपोटी आगाऊ र.रु.१२,००,००,०००/- (अक्षरी र.रु.बारा कोटी फक्त) सन २०२०-२१ च्या अंदाजीत संचलन तूटीचे लेखापरिक्षण होऊन तूट कायम होईपर्यंत माहे नोव्हेंबर २०२१ करीता आगाऊ अदा करावयाचे असल्याने व सदरची बाब आर्थिक स्वरुपाची असल्याने त्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०५५९ विषय क्रमांक- ३७

दिनांक- २७/१०/२०२१ विभाग- लेखा

सुचक- मा.भोईर सुरेश अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/३१/कावि/२०८/२०२१, दि.२७/१०/२०२१.

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे कडील पत्र क्रं.पीएमपीएमएल/मुलेविअ/ २८४४, दिनांक २५/१०/२०२१ अन्वये, सन २०२१-२२ च्या संचलन तूटी मधून र.रु.४३ कोटी आगाऊ उचल स्वरुपात मिळणेकरीता विनंती केली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकात पीएमपीएमएल निधी या लेखाशिर्षावर एकूण तरतूद र.रु.२३८.२१ कोटी करणेत आली असून यामध्ये संचलन तूट १६५.७१ कोटी विविध प्रकारचे पासेस र.रु.२.५० कोटी व बसेस खरेदी र.रु.७०.०० कोटी असा अपेक्षीत खर्च गृहीत धरण्यात आलेला आहे. पी.एम.पी.एम.एल.संस्थेस सन २०२१-२२ च्या संचलन तूटीपोटी आगाऊ उचल स्वरुपात र.रु.४३,००,००,०००/- (अक्षरी र.रु.त्रेचाळीस कोटी फक्त) सन २०२०-२१ च्या अंदाजीत संचलन तूटीचे लेखापरिक्षण होऊन तूट कायम होईपर्यंत आगाऊ अदा करावयाचे असल्याने व सदरची बाब आर्थिक स्वरुपाची असल्याने त्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०५६० विषय क्रमांक- ३८

दिनांक- २७/१०/२०२१ विभाग- पशुवैद्यकीय

सुचक- मा.बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पवै/४/कावि/१२/२०२१, दि.२७/१०/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात मोठ्या संख्याने भटके श्वान व जनावरे यांचेबाबत वेगवेगळया कारणानी अनेक तक्रारी विभागास प्राप्त होत आहेत.जसे की इजा होणे, अपघात होऊन गंभीर जखमी होणे, अतिसार व उलटी व इतर गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्या प्राण्यांबाबत तक्रारी प्राप्त झाल्यावर औषधोपचार तातडीने करण्याची गरज असते. सद्यस्थितीत अश्या भटक्या जनावरांवर दिर्घ काळ उपचार करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकाकडे मनुष्यबळ तथा संसाधने अपुरी असल्याने सुविधा वेळेवर उपलब्ध करुन देणे अवघड जात आहे.परिणामी,तक्रारी वेळेवर पुर्ण न केल्याने तक्रारदार व नागरीकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. सदर सुविधांचे सक्षमीकरण व बळकटीकरण केल्यास आजारी प्राण्यांना वेळेवर उपचार करून तक्रारीपुर्ण करणे शक्य होणार आहे.

उपरोक्त संदर्भीय प्राणी श्रुशूषा केंद्र/उपचार केंद्र हे उपचारदृष्टया स्वयंपूर्ण बनविण्यासाठी भटक्या श्वान व मांजर यांसाठी मोफत उपचार व मालकी हक्क असणा-या श्वान व मांजर संबंधित सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया व बाह्यरुग्ण विभाग याबाबतचा सर्व उपचार वाजवी दरात उपलब्ध करून देण्यासाठी पि.चिं. मनपाचा मानस आहे. त्यान्वये खालील प्रमणे अंदाजपत्रक दर (सेवा शुल्क) सादर करण्यात येत आहे.

<u>प्राणी श्रुशूषा केंद्रयाचे/पशुवैद्यकीय दवाखाने प्रस्तावित संभाव्य दरपत्रक</u>

| अनु. क्र. | तपशील | शुल्क र.रु |
|---|---|---|
| १ | केस पेपर फी | २०/- |
| २ | बाह्यरुग्ण विभाग(OPD)(सामान्य प्रथमोपचार) | १५०/- |
| ३ | Specialized Treatment (Systemic Diseases Treatment Fluid Therapy) | २००/- |
| ४ | रेबीज प्रतिबंधक लस (Anti Rabies Vaccination) | १००/- |
| ५ | क्ष-किरण(लहान जनावरे) X-Ray Of Small Animal | २५०/- |
| ६ | सोनोग्राफी (USG) | ३५०/- |
| ७ | आय.पी.डी शुल्क प्रति दिन | ३००/- |
| ८ | शस्त्रक्रिया सेवा शुल्क (शस्त्रक्रियासाठी लागणारे साहित्य वगळुन) | ४००/- |
| ९ | नसबंदी शस्त्रक्रिया (मनपा मार्फत) श्वान | १२००/- |
| १० | नसबंदी शस्त्रक्रिया (मनपा मार्फत) मांजर | १३००/- |

मे.पीपल फॉर ॲनिमल यासंस्थेने संयुक्त समन्वयाने काम लवकरात चालू करण्याचा प्रस्ताव प्रस्तावित केलेला आहे.मे.पिपल फॉर ॲनिमल्स (पि.एफ.ए) या संस्थेने देऊ केलेली सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी लागाणारे या क्षेत्रात अनुभवी मुनष्य बळ (दोन व्यक्ती) पुरविण्याच्या मोबदल्यात एकुण रक्कम रुपये. ५०,०००/- प्रती माह महानगरपालिकेडुन मागणी केली आहे. त्यान्वये सदर केंद्र सुस्थितीत व सुरळीत चालविण्यासाठी सदर संस्थेची मदत होउन सेवा

नियमित करणे शक्य होणार आहे. त्यामुळे नमुद रक्कम त्यास मा.स्थायी समितीच्या मान्यतेने एक वर्ष कालावधीसाठी देणे उचित वाटते. तसेच पशुशल्यचिकित्सक (Veterinary Surgeon)नेमणुक करणे आवश्यक आहे. सदर पद हे मानधन तत्वावर सहा महिने कालावधी करीता र.र.५०,०००/- प्रति माह मानधनावर नेमणुक करणे आवश्यक आहे.मा.स्थायी समितीच्या मंजुरीने सदरचा खर्च पशुवैद्यकीय विभागाच्या अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षकामधून खर्च करण्यात येईल.

सबब, पशुवैदयकीय विभागाकडील भटक्या प्राण्यासाठी ऍनिमल शेल्टर(प्राणी सुश्रुषा केंद्र) व औषधोपचार केंद्र सुरु करणेकामी मे.पीपल फॉर ऍनिमल या संस्थे बरोबर संयुक्त समन्वयाने एक वर्ष कालावधीकरीता कामकाज करणे व सदर संस्थेने देऊ केलेली सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी या क्षेत्रात लागणारे अनुभवी मुनष्य बळ त्या माध्यामातून सल्लागार व व्यवस्थापन यांचे शुल्क यामध्ये प्रती किमान माह दोनशे श्वान व मांजर यांचेवर उपचार होणे आवश्यक आहे. त्यापेक्षा कमी झाल्यास संस्थेच्या प्रमाणात व्यवस्थापन शुल्क कपात करण्यात येईल. दोनशे पेक्षा कितीही अधिक झाले तर कुठलेही वाढीव शुल्क देण्यात येणार नाही एकुण रक्कम रुपये. ५०,०००/- प्रती माह महानगरपालिकेकडून मागणी केले प्रमाणे खर्चास मान्यता घेणे तसेच पशुशल्यचिकित्सक (Veterinary Surgeon) पद मानधन तत्वावर सहा महिने कालावधी करीता र.र.५०,०००/- प्रति माह मानधनावर नेमणुक करणे व येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेस तसेच पाळीव श्वान, मांजर, इत्यादी प्राण्यांना सार्वजनिक ठिकाणी नागरिक शौचालयास घेवून जातात, ज्याप्रमाणे उघड्यावर शौच करणा-या नागरिकांना दंड केला जातो, त्याप्रमाणे सार्वजनिक ठिकाणी पाळीव प्राणी शौचालयासाठी घेऊन जाणा-या नागरिकांना ५००/- दंड करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०५६१ | विषय क्रमांक- ३९

दिनांक- २७/१०/२०२१ | विभाग- विद्युत ह क्षेत्रिय

सुचक- मा.बुर्डे सुवर्णा | अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वि/हक्षेका/कावि/३४४/२०२१, दि.२५/१०/२०२१

२) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.हक्षेका/वि/कावि/३४५/२०२१, दि.२५/१०/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड म.न.पा.चे कासारवाडी आरक्षण क्र.13 मध्ये खेळाचे मैदान विकसित करणेचे काम चालु आहे. उपरोक्त विषयांकित काम निवीदा नोटीस क्र.2/1/2018-19, कामाचे आदेश क्र.विमुका/5/कावि/271/2018 दि.12.10.2018 अन्वये मे. इलेक्ट्रो मेकॅनिक्स, पुणे या एजन्सीस देणेत आले आहेत. विषयांकित कामी येणारे र.रु.1,86,46,454 /- पेक्षा 11.7% कमी म्हणजेच र.रु.1,64,64,817/- ( अक्षरी र.रु.एक कोटी चौसष्ठ लाख चौसष्ठ हजार आठशे सतरा फक्त) चे खर्चास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.3100 दि.29.08.2018 अन्वये मान्यता मिळाली आहे. सदर कामास मा.महापालिका सभा ठराव क्र.42 दि.20.06.2017 अन्वये र.रु.20,00,00,000 /- ( अक्षरी र.रु.वीस कोटी) चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत हॉकी इंडीया यांच्या मान्यतेने 11 वी हॉकी इंडिया राष्ट्रीय चँपियनशिप स्पर्धा 2021 मे.ध्यानचंद पॉलीग्रास हॉकी मैदान, नेहरुनगर येथे दि.11 ते 22 डिसेंबर 2021 रोजी करण्याचे नियोजन आहे. मा.सहायक आयुक्त (क्रिडा) यांनी पत्र क्र.क्रिडा/कावि/4/156/2021 दि.08.10.2021 रोजीच्या पत्रान्वये सदर ठिकाणी प्रकाश व्यवस्थे करणे, सी.सी.टी.व्ही. यंत्रणा बसविणे, ध्वनिक्षेपण व्यवस्था करणे इ. कामे करणेबाबत कळविले आहे. सदर काम कालमर्यादित आणि अचानक सुचविले असलेमुळे निवीदा मागवून पूर्ण करणे शक्य नाही. मा.आयुक्त यांनी हॉकी इंडिया राष्ट्रीय चँपियनशिप स्पर्धा 2021 करिता अनुषंगिक स्थापत्य/ विद्युत विषयक कामे चालु निवीदा कामामधून पूर्ण करणेबाबत सूचना दिल्या आहेत. सबब मे.ध्यानचंद पॉलीग्रास हॉकी मैदान, नेहरुनगर येथे विद्युत विषयक कामकाज पूर्ण करणेकरिता कामाचे शासकीय दरसूची आणि मंजूर दरपृथ:करणामधील दर घेवून अंदाजपत्रक केले असता सदर कामाकरिता र.रु.1,84,43,216/- (अक्षरी र.रु.एक कोटी चौ-याऐंशी लाख त्रेचाळीस हजार दोनशे सोळा रुपये फक्त) इतका खर्च अपेक्षित आहे. सदर काम उपरोक्त निवीदा नो.क्र. 2/1, 2018-19 अंतर्गत सुधारित खर्चास मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेवून करणे शक्य आहे.

ह क्षेत्रिय कार्यालयाकडील कासारवाडी आरक्षण क्र.13 मध्ये खेळाचे मैदान विकसित करणेचे काम अंतिम टप्पात आहे. सदर मूळ कामाची खर्च मर्यादा र.रु.1,64,64,817 /- ( अक्षरी र.रु.एक कोटी चौसष्ठ लाख चौसष्ठ हजार आठशे सतरा फक्त) इतकी आहे. सबब कामाची तातडी विचारात घेता कासारवाडी आरक्षण क्र.13 मध्ये खेळाचे मैदान विकसित करणे (निवीदा नो.क्र. 2/1, 2018-19) ह्या कामांतर्गत मे.इलेक्ट्रो मॅकेनिक्स, पुणे या एजन्सीकडून मे.ध्यानचंद पॉलीग्रास हॉकी मैदान, नेहरुनगर येथे विद्युत विषयक कामकाज पूर्ण करुन घेणे आणि विषयांकित कामी येणारा मूळ कामाचा प्रत्यक्ष खर्च र.रु.1,64,64,817/- (अक्षरी र.रु. एक कोटी चौसष्ठ लाख चौसष्ठ हजार आठशे सतरा फक्त) + प्रत्यक्ष वाढीव खर्च र.रु.1,84,43,216/- (अक्षरी र.रु.एक कोटी चौ-याऐंशी लाख त्रेचाळीस हजार दोनशे सोळा रुपये फक्त) असे एकूण प्रत्यक्ष सुधारित खर्च र.रु.3,49,08,033/- (अक्षरी र.रु.तीन कोटी एकोणपन्नास लाख आठ हजार तेहतीस फक्त) चे सुधारित खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०५६२ विषय क्रमांक- ४०

दिनांक- २७/१०/२०२१ विभाग- माहिती न जगसंपर्क

सुचक- मा.संतोष कांबळे अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

संदर्भ- मा.सहाय्यक आयुक्त यांचे पत्र क्र.माजसं/२/कावि/५९१/२०२१, दि.२७/१०/२०२१.

मा.सहाय्यक आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

कोविड-१९ रुग्णालयाच्या उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवर व नागरिकांच्या जनजागृतीकरिता कोविड रुग्णालयाच्या कामकाजाची संपूर्ण माहिती देणारी व्हिडीओ फिल्म तयार करण्याचे नियोजन होते. याकरिता इच्छुक पुरवठाधारकांकडून दर प्राप्त करण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागामार्फत कोटेशन नोटीस क्र.०५/२०२०-२१ नुसार कोटेशन प्रसिद्ध करण्यात आले होते. त्यामध्ये मे. देवदत्त फोटोग्राफी यांचे लघुत्तम प्राप्त झाले होते. प्राप्त कामकाज आदेशानुसार मे. देवदत्त फोटोग्राफी यांनी वेळेमध्ये जनजागृती व्हिडिओ फिल्म तयार करून काम

पूर्ण केले आहे. तरी कोटेशन नोटीस क्र. ०५/२०२०-२१ अन्वये मे.देवदत्त फोटोग्राफी यांनी तयार करून दिलेल्या व्हिडीओ फिल्मकामी झालेल्या र.रु.१,७४,०००/- (अक्षरी र.रु.एक लाख चौ-याहत्तर हजार फक्त)च्या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०५६३ विषय क्रमांक- ४१

दिनांक- २७/१०/२०२१

सुचक- मा.संतोष कांबळे अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

संदर्भ- मा.सहाय्यक आयुक्त यांचे पत्र क्र.माजसं/२/कावि/५२६/२०२१, दि.२९/०९/२०२१.

मा.सहाय्यक आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने कोविड-१९ लसीकरण मोठ्या प्रमाणावर राबविण्यात येत आहे. लसीकरण केंद्रांवर नागरिकांची होणारी गर्दी लक्षात घेवून महानगरपालिकेतर्फे किऑस्क मशीनद्वारे लसीकरणाचे टोकन देण्याची सुविधा देण्यात आली आहे. किऑस्क मशिनद्वारे लसीकरणासाठी टोकन कसे प्राप्त करावे याबाबत नागरिकांमध्ये जागृती करणे आवश्यक आहे. याकामी ३-४ मिनटांची जागृतीपर व्हिडिओ क्लिप तयार करणेकामी माहिती व जनसंपर्क विभागाकडील कोटेशन नोटीस क्र. ०६/२०२१-२२ नुसार इच्छुक पुरवठा धारकांकडून दर मागविण्यात आले होते. त्यामध्ये मे.दर्शन डिजिटल व्हिडिओग्राफी यांचे लघुत्तम दर प्राप्त झाले आहेत. प्राप्त कामकाज आदेशानुसार मे. दर्शन डिजिटल व्हिडिओग्राफी यांनी तयार केलेला व्हिडिओ विविध सोशल मिडिया माध्यमांवर प्रसारित करून नागरिकांना किऑस्क मशीनद्वारे टोकन कसे प्राप्त करायचे याबाबत जागृती करण्यास मदत झाली. तरी कोटेशन नोटीस क्र. ०६/२०२१-२२ अन्वये मे. दर्शन डिजिटल व्हिडिओग्राफी यांनी तयार केलेल्या व्हिडिओ कामी झालेल्या र.रु. २,९५,०००/- (अक्षरी र.रु. दोन लाख पंच्याण्णव हजार फक्त) च्या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०५६४ विषय क्रमांक- ४२

दिनांक- २७/१०/२०२१ विभाग- वाहन दुरुस्ती कार्यशाळा

सुचक- मा.संतोष कांबळे अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.काशा/३/कावि/४९६/२०२१ दि.२६/१०/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

पिंपरी चिंचवड शहरामध्ये कोरोना विषाणू (कोविड -१९) या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव कमी करणेकरीता संक्रमित रूग्ण शोधून कोविड रूग्णालय/कोविड केअर सेंटर इ.ठिकाणी भरती करणे या कामाकरीता क्षेत्रीय कार्यालयनिहाय फिल्ड सर्व्हिलन्स टीम (FST) तयार करण्यात आली.मा.आयुक्त यांनी या टिमकरीता लागणारी आवश्यक सुमो तत्सम प्रकाराची वाहने उपप्रादेशिक परिवहन कार्यालय पिंपरी चिंचवड (आर.टी.ओ.) यांचेमार्फत उपलब्ध करण्यात यावीत

व त्यांचेकडील मंजूर दराने झालेल्या खर्चाचे बिल मा.स्थायी समिती सभेची कार्योत्तर मान्यता घेवून अदा करणेस मान्यता घेणेत आली आहे. या मंजूर प्रस्तावान्वये वैद्यकिय विभागाच्या मागणीप्रमाणे त्या-त्या वेळेस वाहने अधिगृहीत करण्यात आलेली असून झालेल्या खर्चास मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेवून बीले अदायगी करण्यात आलेली आहेत. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या क्षेत्रात करोना या विषाणू प्रसार कमी होत आहे. तथापि अद्यापही प्रादुर्भाव होत असल्याने वैद्यकिय विभागाच्या मागणीनुसार व आवश्यकतेनुसार सध्यस्थितीत ४० आवश्यक वाहने कार्यरत आहेत. सदर वाहनांच्या संखेमध्ये वाढ/घट होण्याची शक्यता आहे. त्यानुसार सद्य स्थितीत चालू असलेली वाहनांची संख्या विचारात घेता दि.०१/०९/२०२१ ते ३१/१०/२०२१ या कालावधीची सध्या कार्यरत असलेल्या ४० वाहनांसाठी व पुढील रुग्णालयांची वाहन मागणी विचारात घेता अंदाजे र.रू. १,०५,०४,२००/- (अक्षरी र.रु एक कोटी पाच लाख चार हजार दोनशेफक्त) खर्च होणार असून सदरचे खर्चास मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, पुणे दि.१७/०५/२०२० चा निर्णय – परिचलन पध्दतीनुसार प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, पुणे पिंपरी चिंचवड व बारामती यांची संयुक्त बैठक दि. १७/०५/२०२० नुसार दर खालीलप्रमाणे –

| अ.क्र. | पुरवठादार व कालावधी | वाहन प्रकार | आरटीओ कडील<br>मंजुर दर प्रतिदिनइंधनासह |
|---|---|---|---|
| १. | मे.प्रज्ञेश एंटरप्रायजेस | झायलो, ईर्टीगा, इनोव्हा, स्कॉपिओ/ तत्सम वाहने | ४१००/- |

सबब उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी चिंचवड (आर.टी.ओ.) कडील मंजूर दराने व त्यांचेमार्फत पुरविलेल्या मे.प्रज्ञेश एंटरप्रायझेस यां एजन्सीकडून फिल्ड सर्व्हिलन्स टिम करिता व इतर कोविड-१९ चे कामाकरिता पुरविणेत आलेल्या वाहनांनकरिता दि.०१/०९/२०२१ ते दि.३१/१०/२०२१ या कालावधीकरीता निविदा न मागविता करारानामा न करता व थेट पद्धतीने वाहने पुरविणेकामी व होणा-या संभाव्य खर्चास र.रू.१,०५,०४,२००/- (अक्षरी र.रु.एक कोटी पाच लाख चार हजार दोनशे फक्त) व पुढील येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मा.स्थायी समिती सभेची कार्योत्तर मान्यता घेणेकामी वसदरचा खर्च भांडार विभागाकडील “कोविड निधी” या लेखाशिर्षामधून खर्ची टाकणे कामी मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०५६५ विषय क्रमांक- ४३

दिनांक- २७/१०/२०२१ विभाग- मध्यवर्ती भांडार

सुचक- मा.भोईर सुरेश अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.अति. आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मभां/१५/कावि/३३८/२०२१, दि.२७/१०/२०२१.

मा.अति. आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे.

भारतीय साथरोग अधिनियम १८९७ सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना दि.१४/०३/२०२० आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ कलम (४१ व ५०) महानगरपालिका

अधिनियम कलम ७३(६) व कलम ६७(३)(क) नुसार कोरोना विषाणूचा (कोविड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मनपामार्फत स्थापन केलेल्या कोविड केअर सेंटर व कॉरंटाईन सेंटर येथील रुग्ण तसेच व्यक्तिंना व मनपा व शासनाने नियुक्त केलेले कर्मचारी यांना गरजेनुसार जेवण व नाष्टा उपलब्ध करुन देणेकामी ई निविदा सूचना क्र.१०/२०२०-२१ अन्वये प्राप्त झालेला लघुत्तम दर रुपये १८०/- प्रति दिन प्रति व्यक्ति यानुसार एकूण १५ पुरवठादार निश्चित करणेत आलेले आहेत. त्यानुषंगाने निर्गत करणेत आलेल्या पुरवठा आदेशानुसार दि.१८/०४/२०२१ अखेर र.रु.१८०/- प्रति दिन प्रति व्यक्ति व दि.१९/०४/२०२१ पासून रुपये २३०/- प्रति दिन प्रति व्यक्ती याप्रमाणे सबंधित पुरवठादारांनी प्रति दिन दुपारचे/ रात्रीचे यापैकी ज्या वेळेस कमाल जेवणाचा पुरवठा केलेला आहे. त्यानुसार सबंधित कोविड केअर सेंटरचे पाक्षिक अहवाल विचारात घेऊन विषयाच्या सविस्तर तपशिलामध्ये नमुद केलेल्या कालावधीमध्ये होणा-या र.रु.३,९७,२१०/- (अक्षरी र.रु.तीन लाख सत्यान्नव हजार दोनशे दहा फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता व विषयाच्या सविस्तर तपशिलामध्ये नमुद केलेले पुरवठादार मे.हॉटेल राजवर्धन यांचेबरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०५६६ विषय क्रमांक- ४४

दिनांक- २७/१०/२०२१

सुचक- मा.कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.कांबळे अंबरनाथ व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मार्फत मा.शहर सुधारणा समिती सदस्यांना पाहणी करण्याकरीता अभ्यास दौ-याचे आयोजन केले जाते. या अभ्यास दौरा करण्याकरीता सिक्कीम या राज्याची पाहणी करीता मा.शहर सुधारणा समिती सदस्यांचा तसेच संबंधित अधिकारी यांचा सिक्कीम या राज्यात अभ्यास दौरा आयोजित आवश्यक त्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०५६७ विषय क्रमांक- ४५

दिनांक- २७/१०/२०२१

सुचक- मा.फुगे भिमाबाई अनुमोदक- मा.कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा.फुगे भिमाबाई व मा.कांबळे अंबरनाथ यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.१९ मधील गोलांडे उदयानाशेजारील सी.डी.वर्कची उर्वरीत कामे करणे या कामाचा आदेश जेपी. इन्फ्रा या ठेकेदार यांना देण्यात आलेला आहे. परंतु सदर ठिकाणी जागा ताब्यात येणे बाकी असले कारणाने सदरचे काम चालू होउ शकले नाही. सदयस्थितीत सुदर्शननगर येथील रासने सभागृहाजवळ व इतर दोन ठिकाणी नाल्याची भिंत कोसळल्यामुळे नागरीकांच्या सुरक्षिततेच्या

दृष्टीकोनातून सदरचे काम करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.नगरसदस्य यांच्या मागणीनुसार प्रभाग क्र.१९ मधील सुदर्शननगर येथील रासने सभागृहाजवळील व इतर दोन ठिकाणी नाल्याच्या भिंतीचे व इतर कामे करणे आवश्यक आहे. सदर निविदा रकमेतील रक्कम रु.३७,४९,१५३/- इतक्या रक्कमेचे काम शिल्लक आहे. तरी सदरील प्रभाग क्र.१९ मधील गोलांडे उदयानाशेजारील सी.डी.वर्कची उर्वरीत कामे करणे या कामाच्या शिल्लक रक्कमेतून प्रभाग क्र.१९ मधील सुदर्शननगर येथील रासने सभागृहाजवळील व इतर दोन ठिकाणी नाल्याच्या भिंतीचे व इतर कामे करणेच्या स्थळ बदलास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०५६८ विषय क्रमांक- ४६

दिनांक- २७/१०/२०२१

सुचक- मा.भोईर सुरेश अनुमोदक- मा.कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा.भोईर सुरेश व मा.कांबळे अंबरनाथ यांचा प्रस्ताव.

पुणे महानगर नियोजन समिती निवडणुकीचे मतदान दि.१०/११/२०२१ रोजी असल्याने मा.स्थायी समितीची दि.१०/११/२०२१ ची नियमित साप्ताहीक सभा दि.११/११/२०२१ रोजी दु.२:३० वा. घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०५६९ विषय क्रमांक- ४७

दिनांक- २७/१०/२०२१

सुचक- मा.भोईर सुरेश अनुमोदक- मा.कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा.भोईर सुरेश व मा.कांबळे अंबरनाथ यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड मनपा हद्दी मध्ये राहणा-या कुटूंब प्रमुखाचे कोविड ने मृत्यु झाले असल्यास त्यांचे कुटुंबाला मदत करताना संबंधित महिलेच्या वयाची मर्यादा रद्द करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०५७० विषय क्रमांक- ४८

दिनांक- २७/१०/२०२१

सुचक- मा.बापु उर्फ शत्रुघ्न काटे अनुमोदक- मा.सुजाता पालांडे

संदर्भ- मा.बापु उर्फ शत्रुघ्न काटे व मा.सुजाता पालांडे बारणे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व क्षेत्रिय कार्यालया मध्ये फायर स्टेशन उभारणेत यावीत. तसेच ज्या वस्त्यामधील रस्ते छोटे व अरूंद आहेत. त्या वस्तीतील रस्त्यांवर अग्निशामक वाहन जातील आशा प्रकारची छोटी वाहने खरेदी करण्याची कार्यवाही करणेत यावी तसेच सदरचा विभाग अतिरिक्त आयुक्त (१) यांचे नियंत्रणाखाली ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०५७१ विषय क्रमांक- ४९

दिनांक- २७/१०/२०२१

सुचक- मा.कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.कांबळे अंबरनाथ व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नगरसचिव विभागाकडील सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात बोनस तथा सानुग्रह अनुदान या लेखाशिर्षावर र.रू. ३८,५०,०००/- तरतुद करण्यात आलेली आहे. तथापि कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान व जादा रक्कम अदा करणेकामी सदरची तरतुद कमी पडत असल्याने नगरसचिव विभागाअंतर्गत खालीप्रमाणे तरतुदीमध्ये वाढ घट करण्यास मान्यता देणेत यावी हि विनंती.

| अ. क्र. | लेखाशिर्षाचे नाव | पान क्र./ अ.क्र. | सन २०२१-२२ ची तरतुद | घट करावयाची तरतुद | वाढ करावयाची तरतुद | एकुण तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बोनस तथा सानुग्रह अनुदान | ९०/१ | ३८,५०,०००/- | ० | ४,००,०००/- | ४२,५०,०००/- |
| २ | मा. अध्यक्ष, स्थायी समिती वाहन इंधन | ९२/६ | ४,००,०००/- | २,००,०००/- | ० | २,००,०००/- |
| ३ | मा. सत्तारुढ पक्षनेता वाहन इंधन | ९२/८ | ३,५०,०००/- | २,००,०००/- | ० | १,५०,०००/- |
| | एकुण | | | ४,००,०००/- | ४,००,०००/- | |

वरिलप्रमाणे तरतुदीमध्ये वाढ/ घट करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(वाढ/ घट र.रु. ४,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०५७२ विषय क्रमांक- ५०

दिनांक- २७/१०/२०२१

सुचक- मा.कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.कांबळे अंबरनाथ व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

डांगे चौक येथे रोटरी/ दुमजली उड्डाणपुल बांधणे या कामांतर्गत डांगे चौक येथे ग्रेड सेपरेटर बांधणे, बोपखेल फाडा ते दिघी जकातनाका पर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण करुन मजबूतीकरण करणेच्या कामाबाबत सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकीय तरतुदीत प्रस्तावात नमुद प्रमाणे वाढ/ घट करणेस मान्यता देण्यात येत आहे. (वाढ/ घट र.रु.४ कोटी)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०५७३ विषय क्रमांक- ५१

दिनांक- २७/१०/२०२१

सुचक- मा.बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.बुर्डे सुवर्णा व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

स्थापत्य बीआरटीएस विभागाकडील प्रस्तावात नमुद प्रपत्र अ नुसार तरतुदीमध्ये वाढ/ घड करणेस मान्यता देण्यात येत आहे.

(वाढ/घट र.रु.१५,१०,६५,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०५७४ विषय क्रमांक- ५२

दिनांक- २७/१०/२०२१

सुचक- मा.कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.कांबळे अंबरनाथ व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड शहरामधील प्रभाग क्र.१३ मधील विविध क्रीडा विषयक कामे करणेबाबत स्थानिक नागरिकांची मागणी होत आहे.सदर कामाचा मनपाचे अंदाजपत्रकात सन २०२१-२२ चे मूळ अंदाजपत्रकात समावेश आहे. सदरची नवीन कामे काढणेकरीता प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे तरतूद वर्गीकरणास मान्यता देण्यात येत आहे. (वाढ/ घट र.रु.१,२०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०५७५ विषय क्रमांक- ५३

दिनांक- २७/१०/२०२१

सुचक- मा.कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा.संतोष कांबळे

संदर्भ- मा.कांबळे अंबरनाथ व मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.३१ मधील विविध कामे करणेकामी प्रस्तावात नमुद प्रमाणे सन २०२१-२२ च्या तरतुदीमध्ये वाढ/ घट करण्यास मान्यता देण्यात येत आहे. (वाढ/ घड र.रु.२,००,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०५७६ विषय क्रमांक- ५४

दिनांक- २७/१०/२०२१

सुचक- मा.कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.कांबळे अंबरनाथ व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

ई क्षेत्रीय कार्यालय येथील प्रभाग क्र.४ मधील रस्ता रुंदीकरणात अडथळा ठरणारे उच्चदाब व लघुदाब खांब व तारा हलविणे व विद्युत विषयक काम करणे आवश्यक आहे. परंतु सदर कामांकरीता तरतुद कमी असेलेने प्रस्तावात नमुद प्रमाणे तरतूद वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे. (वाढ/ घट र.रु.७५,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०५७७ विषय क्रमांक- ५५

दिनांक- २७/१०/२०२१

सुचक- मा.कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.कांबळे अंबरनाथ व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

ड क्षेत्रिय कार्यालय मुख्यालयाचे सन २०२१-२२ च्या मुळ अंदाजपत्रकातील "विशेष योजना" या लेखाशिर्षकातील प्रभाग क्र.२५ वाकड येथील चालू विकास कामांना प्रस्तावात नमुद प्रमाणे वाढीव तरतुद देणेस मान्यता देण्यात येत आहे. (वाढ/ घट र.रु.१,७२,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०५७८ विषय क्रमांक- ५६

दिनांक- २७/१०/२०२१

सुचक- मा.कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.कांबळे अंबरनाथ व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.२ मधील चालू असलेल्या कामांना प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे वाढ/ घट करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरून प्रभाग क्र.२ मधील काही कामांची शिल्लक तरतुदीमधून चालू कामांसाठी वर्ग करणे आवश्यक आहे. सबब क क्षेत्रिय कार्यालयातील प्रभाग क्र.२ मधील सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकामध्ये कामाच्या तदतूदीमध्ये प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे वाढ/ घट करणेस मान्यता देण्यात येत आहे. (वाढ/ घट र.रु.२,१०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०५७९ विषय क्रमांक- ५७

दिनांक- २७/१०/२०२१

सुचक- मा.कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.कांबळे अंबरनाथ व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या खाली नमुद केलेप्रमाणे स.न.२०२१-२२ च्या अंदाजपत्रकातील कामांस वाढ/ घट करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | लेखाशिर्ष | पान क्र. अ.क्र | सन २०२१-२२ ची तरतूद | वाढ | घट | सन २०२१-२२ चा सुधारित अंदाजपत्रक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | भक्ती शक्ती चौक येथील फुटपाथ स्मार्ट अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार विकसित करणे. | १५.०० कोटी | विशेष योजना | ४२/ ६७ | ७६.३५ लाख | ३६.०० लाख | - | ११२.३५ लाख |
| २) | रावेत येथे विपष्यणा केंद्र उभारणे. | १५.०० कोटी | विशेष योजना | ४५/ १५० | ३८.१८ लाख | - | ३६.०० लाख | २.१८ लाख |
| | **एकूण** | | | | ११२.३५ लाख | ३६.०० लाख | ३६.०० लाख | ११२.३५ लाख |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०५८०　　　　　　　　　　　　　　विषय क्रमांक- ५८
दिनांक- २७/१०/२०२१
सुचक- मा.कांबळे अंबरनाथ　　　　　　　　　　　　अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई
संदर्भ- मा.कांबळे अंबरनाथ व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.८ मधील चालू असलेल्या कामांना प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे वाढ/ घट करणे आवश्यक आहे. सबब क क्षेत्रिय कार्यालयातील प्रभाग क्र.८ मधील सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकामध्ये कामाच्या तदतूदीमध्ये प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे वाढ/ घट करणेस मान्यता देण्यात येत आहे. (वाढ/ घट र.रु.२६,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०५८१　　　　　　　　　　　　　　विषय क्रमांक- ५९
दिनांक- २७/१०/२०२१
सुचक- मा.कांबळे अंबरनाथ　　　　　　　　　　　　अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई
संदर्भ- मा.कांबळे अंबरनाथ व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.५ मधील बनाचा ओढा विकसित करणे व सुधारणा करणे, रस्त्यांचे हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करणे, आरक्षण क्र.४०२ येथे क्रीडा विहार बांधणे, राजमाता जिजाऊ उड्डाणपुल ते गंगोत्रीपार्क पर्यंतचा रस्ता अत्याधुनिक पद्धतीने विकसित करणे या नविन कामांसाठी प्रस्तावात नमुद प्रमाणे अंदाजपत्रकीय रक्कम बदलणे व तरतूद वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. (वाढ/ घट र.रु.१,२५,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०५८२　　　　　　　　　　　　　　विषय क्रमांक- ६०
दिनांक- २७/१०/२०२१　　　　　　　　　　　　　　विभाग- प्राथमिक शिक्षण
सुचक- मा.संतोष कांबळे　　　　　　　　　　　　　अनुमोदक- मा.अभिषेक बारणे
संदर्भ- मा.अति. आयुक्त(१) यांचेकडील पत्र क्र.जा.क्र.शिक्षण/६/कावि/५७/२०२१ दि.२७/१०/२०२१.

मा.अति. आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभागाच्या सन २०२१-२२ अंदाजपत्रकामध्ये “शाळांवार सफाई सेवक मानधन” या लेखाशिर्षावर र.रु.१५,००,०००/- इतकी तरतूद उपलब्ध करून देण्यात आलेली होती. सद्यस्थितीमध्ये सदरच्या लेखाशिर्षावर सप्टेंबर २०२१ अखेर र.रु.८,४३,८४६/- फक्त शिल्लक राहिलेली आहे. शाळांवर स्वच्छता सेवक यांना किमान वेतन अधिनियम १९४८ च्या तरतुदीनुसार दि.०२/०२/२०१९ पूर्वीच्या ६ महिन्यांच्या कालावधीतील किमान वेतनातील फरक अदा करणेबाबत सहा.कामगार आयुक्त तथा विनिर्दिष्ट अधिकारी किमान वेतन अधिनियम १९४८ पुणे यांचे आदेश झालेले आहेत त्यानुसार त्या फरकाची रक्कम अंदाजे र.रु.६०,००,०००/- होत आहे.ती रक्कम याच वर्षी अदा करावी लागणार आहे. प्राथमिक शिक्षण विभागाच्या शाळांवार स्वच्छता सेवक मानधन बिले व फरक बिल तयार करावे लागणार असल्याने प्राथमिक शिक्षण विभागाच्या अंदाजपत्रकामधील “शाळांवार सफाई सेवक मानधन” या लेखाशिर्षावर सद्यस्थितीमध्ये शिल्लक असलेली तरतूद अपुरी पडत आहे त्यामुळे सदरच्या लेखाशिर्षावर तूर्तास खालीलप्रमाणे घट /वाढ करणे आवश्यक आहे.

| पृष्ठ क्र. | अ.क्र. | लेखाशिर्षाचे नाव | अंदाजपत्रकीय तरतूद | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|
| २४४ | ०९ | शाळांवार सफाई सेवक मानधन | १५,००,०००/- | ६०,००,०००/- | -- |
| २४४ | ०४ | स्थायी अस्थापना | १०५,६०,००,०००/- | -- | ६०,००,०००/- |
| | | एकूण | | ६०,००,०००/- | ६०,००,०००/- |

तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभागाच्या सन २०२१-२२ अंदाजपत्रकामध्ये "शाळांवार सफाई सेवक मानधन" या लेखाशिर्षावर सद्यस्थितीत तरतूद कमी असल्याने वरील तक्त्यामध्ये नमूद केलेप्रमाणे सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकामध्ये वाढ/ घट करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

------------

(अॅड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे)
सभापती, स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११०१८.



(उल्हास बबनराव जगताप)
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८, नगरसचिव विभाग
क्रमांक - नस/३/कावि/१७६७/२०२१
दिनांक - २९/१०/२०२१

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.

(क्र.वायसीएमएच/७/कावि/१२७४/२०२१ दि.०६/१०/२०२१ विषय क्र.७ चे लगत)

7

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११०१८
यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालय
दिनांक-१३/०९/२०२१ ते दि.२३/०९/२०२१ अखेर Walk In Interview करिता उपस्थित उमेदवारांमधून निवड केलेल्या खालील वरिष्ठ निवासी, कनिष्ठ निवासी व शिफ्ट ड्युटी उमेदवारांची निवडयादी
प्रपत्र अ
(नेमणूक कालावधी दि.०7/१०/२०२१ ते दि.१३/१२/२०२१ अखेर)

| अ.क्र | उमेदवाराचे नाव | शैक्षणीक अर्हता | प्रवर्ग | निवड प्रवर्ग | नियुक्ती विभाग | मानधन र.रू |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ.पायल संतोष बोबडे | एम.एस (गायनेंक) | भज-क | अ.जा | गायनेंक | ६५०००/- |
| २ | डॉ.अदिती शशीकांत सावंत | एम.एस (गायनेंक) | खुला | एसईबीसी | गायनेंक | ६५०००/- |
| ३ | डॉ.निलम राजेश पांडे | एम.डी. (मेडीसीन) | खुला | इ.मा.व | मेडीसीन | ६५०००/- |
| ४ | डॉ. अमृता पुरूषोत्तम कडबे | एम.डी. मेडीसीन | अ.जाती | अ.जाती | कम्यु.(मेडी) | ६५०००/- |
| ५ | डॉ.सिध्दी राजाराम गव्हाळे | एम.डी(बालरोग) | अ.जाती | अ.जाती | बालरोग | ६५०००/- |
| ६ | डॉ.अश्विनी भास्कर गागरे | एम.डी (रेडिओ) | खुला | अ.जाती | रेडिओलॉजी | ६५०००/- |
| ७ | डॉ.अमोल तानाजी मोहिते | एम.बी.बी.एस डी.एन.बी(भुल) | खुला | खुला | आय.सी.यु | ६५०००/- |

कनिष्ठ निवासी व शिफ्ट ड्युटी

| अ.क्र | उमेदवाराचे नाव | शैक्षणीक अर्हता | प्रवर्ग | निवड प्रवर्ग | नियुक्ती विभाग | मानधन र.रू |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ.पायल प्रदिपकुमार लड्डा | एम.बी.बी.एस | खुला | इडब्ल्युएस | आयसीयु-१ | ५५०००/- |
| २ | डॉ.रिमा मिलींद सुर्यवंशी | एम.बी.बी.एस | खुला | खुला | मेडीसीन-१ | ५५०००/- |
| ३ | डॉ.विशाल प्रभाकर महाजन | एम.बी.बी.एस | खुला | इ.मा.व | मेडीसीन-२ | ५५०००/- |
| ४ | डॉ.निखिल पुरूषोत्तम कोहाड | एम.बी.बी.एस | खुला | अ.जमाती | मेडीसीन-३ | ५५०००/- |
| ५ | डॉ.प्रतिक्षा रविंद्र ओव्हाळ | एम.बी.बी.एस | अ.जाती | अ.जाती | इम (मेडी)-१ | ५५०००/- |
| ६ | डॉ. श्रध्दा एकनाथ बडधे | एमबीबीएस | भ.ज-ड | भज-ड-१ | आयसीयु-२ | ५५०००/- |
| ७ | डॉ. अक्षय दिलीप पुणेकर | एम.बी.बी.एस | भ.ज-क | भ.ज-क-२ | आयसीयु-३ | ५५०००/- |
| ८ | डॉ. स्नेहल काशीनाथ कुबडे | एम.बी.बी.एस | अ.जा | खुला | पॅथोलॉजी | ५५०००/- |
| ९ | डॉ. मेघा पांडे | एम.बी.बी.एस | खुला | खुला | इम (मेडी)-२ | ५५०००/- |
| १० | डॉ.विशाखाव्यंकटराव पाटील | एम.बी.बी.एस | खुला | खुला | डायलेसिस-१ | ५५०००/- |
| ११ | डॉ. स्मृती अनिल यादव | एम.बी.बी.एस | खुला | इडब्ल्युएस | आयसीयु-४ | ५५०००/- |
| १२ | डॉ.अश्विनी मारूती देशमुख | एम.बी.बी.एस | भ.ज-ब | एसईबीसी | आयसीयु-५ | ५५०००/- |
| १३ | डॉ. श्रेया जनार्धन नामदे | एम.बी.बी.एस | इ.मा.व | इ.मा.व | आयसीयु-६ | ५५०००/- |
| १४ | डॉ. अक्षता शंकर चाटला | एम.बी.बी.एस | इ.मा.व | एसईबीसी | आयसीयु-७ | ५५०००/- |
| १५ | डॉ. रूपाली मच्छिंद्र यलगट्टे | एम.बी.बी.एस | इ.मा.व | अ.जा-१ | आयसीयु-८ | ५५०००/- |
| १६ | डॉ. अंजली सुर्यकांत भुरे | एम.बी.बी.एस | खुला | अ.जा-२ | आयसीयु-९ | ५५०००/- |
| १७ | डॉ. अजिंक्य दीपक गिरी | एम.बी.बी.एस | वि.जा-अ | एसईबीसी | इम.(मेडी)-३ | ५५०००/- |
| १८ | डॉ.प्रियंका भास्कर आहेर | एम.बी.बी.एस | खुला | इ.मा.व | डायलेसिस-२ | ५५०००/- |
| १९ | डॉ. सुहास सतिश वाघे | एम.बी.बी.एस | भ.ज-क | अ.जमाती | आयसीयु-१० | ५५०००/- |
| २० | डॉ.शामली दामोधर कोकाटे | एम.बी.बी.एस | अ.ज | इ.मा.व | सर्जरी-१ | ५५०००/- |
| २१ | डॉ.साधना सुभाष काळे | एम.बी.बी.एस | खुला | अ.जा | बालरोग-१ | ५५०००/- |
| २२ | डॉ. विनिता सी नायर | एम.बी.बी.एस | खुला | खुला | सर्जरी-२ | ५५०००/- |
| २३ | डॉ. विकास वैजनाथ केकाण | एम.बी.बी.एस | भ.ज-ड | खुला | शिफ्ट ड्युटी | ७५०००/- |
| २४ | डॉ. साहिल परवेझ | एम.बी.बी.एस | खुला | अ.जा | डायलेसिस-३ | ५५०००/- |
| २५ | डॉ. प्रगती विकासराव कुर्मे | एम.बी.बी.एस डी.सी.एच | इ.मा.व | इ.मा.व | बालरोग-२ | ५५०००/- |

आदेश क्र. वायसीएमएच/७/कावि/1275/२०२१
दिनांक- 07/१०/२०२१

(राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८

(क्र.वायसीएमएच/७/कावि/१२३०/२०२१ दि.२२/०९/२०२१ विषय क्र.८ चे लगत)

8

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११०१८
यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालय

दिनांक-२३/०८/२०२१, दि.३०/०८/२०२१ व दि.०६/०९/२०२१ रोजी Walk In Interview करिता उपस्थित उमेदवारांमधून निवड केलेल्या खालील वरिष्ठ निवासी व कनिष्ठ निवासी उमेदवारांची

निवड यादी

प्रपत्र अ
(नेमणूक कालावधी दि.१६/०९/२०२१ ते दि.१३/१२/२०२१ अखेर)

| अ.क्र | उमेदवाराचे नाव | शैक्षणीक अर्हता | प्रवर्ग | निवड प्रवर्ग | नियुक्ती विभाग | दरमहा मानधन र.रू |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ.राधिका किसनलाल जयपुरिया | एम.बी.बी.एस एम.डी (रेडिओ) | खुला | खुला | रेडिओलॉजी | ६५०००/- |
| २ | डॉ.इनायतहसन इब्राहिम शेरकर | एम.बी.बी.एस डी.एन.बी(ऑर्थो) | खुला | अ.जा | ऑर्थोरोग | ६५०००/- |
| ३ | डॉ.अनुप सुरेश लाटणे | एम.बी.बी.एस एम.डी (मेडी) | एसबीसी | अ.जा | मेडीसीन | ६५०००/- |
| ४ | डॉ. राकेश सुधीर शिंदे | एम.बी.बी.एस एम.डी मेडीसीन | खुला | इ.मा.व | मेडीसीन | ६५०००/- |
| ५ | डॉ. कृष्णा केशवराव दळवी | एम.बी.बी.एस डी.एन.बी(मेडी) | खुला | एसईबीसी | मेडीसीन | ६५०००/- |

कनिष्ठ निवासी

| अ.क्र | उमेदवाराचे नाव | शैक्षणीक अर्हता | प्रवर्ग | निवड प्रवर्ग | नियुक्ती विभाग | दरमहा मानधन र.रू |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ. मयुरी शरद पाटील | एम.बी.बी.एस एम.एस (नेत्र) | खुला | खुला | नेत्ररोग | ५५०००/- |
| २ | डॉ.पल्लवी भरत राजपुत | एम.बी.बी.एस | खुला | इ.मा.व | उररोग | ५५०००/- |
| ३ | डॉ.प्रियंका भारती | एम.बी.बी.एस | इ.मा.व | इ.मा.व | गायनॅक | ५५०००/- |
| ४ | डॉ.ऋचा प्रकाश नवघणे | एम.बी.बी.एस | खुला | इडब्ल्युएस | मेडीसीन | ५५०००/- |
| ५ | डॉ.समिक्षा सुभाष वाघचौरे | एम.बी.बी.एस | इ.मा.व | इ.मा.व | मेडीसीन | ५५०००/- |
| ६ | डॉ.अविनाश राम मोराळे | एम.बी.बी.एस | भ.ज-ड | इ.मा.व | मेडीसीन | ५५०००/- |
| ७ | डॉ.रितिका राकेश कुमारी | एम.बी.बी.एस | खुला | एसईबीसी | मेडीसीन | ५५०००/- |
| ८ | डॉ.सुशेन नारायण धस | एम.बी.बी.एस | भ.ज-ड | अ.जाती | मेडीसीन | ५५०००/- |
| ९ | डॉ.राहुल मोहन पाराशर | एम.बी.बी.एस | खुला | अ.जाती | मेडीसीन | ५५०००/- |
| १० | डॉ. सायली प्रविण बारस्मे | एम.बी.बी.एस | खुला | एसईबीसी | मेडीसीन | ५५०००/- |

आ दे श

क्रआदेश क्र. वायसीएमएच/७/कावि/११८७/२०२१
दिनांक- १६/०९/२०२१ चे लगत.

(राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८

(क्र. .वायसीएमएच/७/कावि/११९४/२०२१ दि.२१/०९/२०२१ विषय क्र.९ चे लगत)

९

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी-४११०१८
पदव्युत्तर संस्था यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालय

तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नेमणुक केलेल्या व दि.१७ सप्टेंबर २०२१ अखेर सेवा संपुष्टात येणा-या विविध पदावरील-३० उमेदवारांची सेवा कोविड-१९चे कामकाजाकरीता अधिग्रहित करावयाची निवडयादी.

प्रपत्र 'अ'

खालील तक्त्यात नमुद केलेल्या पदांकरीता सेवा अधिग्रहित नियुक्ती कालावधी
(दि.२०/०९/२०२१ ते दि.१९/१०/२०२१ अखेर ३० दिवस)

| अक्र. | उमेदवारांचे नाव | पदनाम | निवड प्रवर्ग | किमान वेतन/ दरमहा देय मानधन र.रू | आदेश स्विकृत स्वाक्षरी/ पोहच |
|---|---|---|---|---|---|
| १ | आशा सुदाम सुपे | लॅब टेक्निशियन | अ.जमाती | २३५००/- | |
| २ | मधुरा नवनाथ लोंखडे | लॅब टेक्निशियन | इ.मा.व | २३५००/- | |
| ३ | नम्रता गजानन राठोड | लॅब टेक्निशियन | इ.मा.व | २३५००/- | |
| ४ | भावना पेत्रास जाधव | लॅब टेक्निशियन | इ.मा.व | २३५००/- | |
| ५ | तुकाराम बाळू पाखरे | लॅब टेक्निशियन | इ.मा.व | २३५००/- | |
| ६ | अनिल नारायण देमगुंडे | लॅब टेक्निशियन | इडब्ल्युएस | २३५००/- | |
| ७ | हर्षदा रोहिदास वनवे | फार्मासिस्ट | एसईबीसी | २३५००/- | |
| ८ | प्रथमेश ज्ञानेश्वर जाधव | डाटाएंट्री ऑपरेटर | इ.मा.व | २३५००/- | |
| ९ | प्रशांत बंडू खामकर | पुरूषकक्ष मदतनीस | खुला | २०५००/- | |
| १० | अनिकेत नारायण चिंचकर | पुरूषकक्ष मदतनीस | खुला | २०५००/- | |
| ११ | संजय भाऊसाहेब पवार | पुरूषकक्ष मदतनीस | अ.जाती | २०५००/- | |
| १२ | शांतीलाल शिलदार पावरा | पुरूषकक्ष मदतनीस | अ.जमाती | २०५००/- | |
| १३ | आकाश सागर गवते | पुरूषकक्ष मदतनीस | भ.ज-ब | २०५००/- | |
| १४ | सुरेश बाळू वाघ | पुरूषकक्ष मदतनीस | वि.मा.प्र | २०५००/- | |
| १५ | गोविंद धोंडीराम इरबटनवाड | पुरूषकक्ष मदतनीस | इ.मा.व | २०५००/- | |
| १६ | किरण प्रकाश पाटील | पुरूषकक्ष मदतनीस | इ.मा.व | २०५००/- | |
| १७ | गजानन वामन भोपळे | पुरूषकक्ष मदतनीस | अ.जाती | २०५००/- | |
| १८ | कैलास शंकर ठुबल | पुरूषकक्ष मदतनीस | अ.जमाती | २०५००/- | |
| १९ | सुप्रिया संजय जमदाडे | स्त्रीकक्ष मदतनीस | खुला | २०५००/- | |
| २० | रेखा केरबा त्रिभुवन | स्त्रीकक्ष मदतनीस | अ.जाती | २०५००/- | |
| २१ | रूपाली अनुरथ वाघमारे | स्त्रीकक्ष मदतनीस | अ.जाती | २०५००/- | |
| २२ | अनुष्का बालाजी घोडके | स्त्रीकक्ष मदतनीस | भ.ज-क | २०५००/- | |
| २३ | अंजना देविदास घोले | स्त्रीकक्ष मदतनीस | भ.ज-ड | २०५००/- | |
| २४ | सुप्रिया सुरेश गायकवाड | स्त्रीकक्ष मदतनीस | अ.जाती | २०५००/- | |
| २५ | शंकुतला चंद्रकांत निगळे | स्त्रीकक्ष मदतनीस | अ.जमाती | २०५००/- | |
| २६ | सुरेखा किसन मांडवे | स्त्रीकक्ष मदतनीस | अ.जमाती | २०५००/- | |
| २७ | आकांक्षा राजू माने | स्त्रीकक्ष मदतनीस | व्ही.जे.ए | २०५००/- | |
| २८ | स्वराजंली धनंजय भोकरे | स्त्रीकक्ष मदतनीस | भ.ज-ब | २०५००/- | |
| २९ | कल्पना सुरेश बोरूडे | स्त्रीकक्ष मदतनीस | इ.मा.व | २०५००/- | |
| ३० | रूपाली पकंज बोरसे | स्त्रीकक्ष मदतनीस | इ.मा.व | २०५००/- | |

आदेश क्र. वायसीएमएच/७/कावि/११८३/२०२१
दिनांक- २० /०९/२०२१ चे लगत

(राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८

(क्र.उद्यान/२/कावि/६२२/२०२१ दि.२०/१०/२०२१ विषय क्र.१० चे लगत)

उद्याने देखभाल मुदतवाढ घेणेकामाचे मा.स्थायी समिती समोर सादर करावयाचे

प्रपत्र 'अ'

| अ. क्र | उद्यानाचे नांव | मुळ निविदा | पुर्वीच्या ठेकेदाराचे नांव | दरमहा र.रू. | मुळ आदेशाचा कालावधी | | आवश्यक मुदतवाढ कालावधी | सदर कालावधीत अदा करावयाची रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | क,ड,ई व ह क्षेत्रीय कार्यालयांतर्गत रस्ते मध्य दुभाजक सुशो.देखभाल करणे | १२/२ २०१७-१८ | मे.कोमल स्वयंरोजगार सेवा स.संस्था मर्या. | ३०,०१४/- | २/२/२०१८ | ३१/८/२०२१ | ३१/१०/२०२१ | ६०,०,२८/- |
| २ | दिघी रस्ता मध्य दुभाजक सशोभिकरण करून १ वर्षे देखभाल करणे | ९/२०१८-१९ | में.अथर्व स्वयंरोजगार औदयो.सेवा संस्था मर्या. | १७,०८०/- | २७/२/२०१९ | ३१/८/२०२१ | ३१/१०/२०२१ | ३४,१६०/- |
| ३ | भोसरी प्राधिकरण से.नं ७ व १० मधील रस्ते मध्यदुभाजक सुशोभिकरण देखभाल करणे | १८/२ २०१७-१८ | मे.निसर्ग लॅन्डस्केप सर्व्हीसेस | २,०३,८६९/- | २/५/२०१८ | ३१/८/२०२१ | ३१/१०/२०२१ | ४,०७,७३८/- |
| ४ | मनपाचे टाटा मोटर्स रस्ता (त्रिवेणीनगर चौक ते नाशिक रोड भोसरी) सुशोभिकरण देखभाल करणे | १/७/ २०१८-१९ | मे. कृषितेज डेव्हलपर्स | ३१०३५६/- | २१/०८/२०१८ | ३१/८/२०२१ | ३१/१०/२०२१ | ६,२०,७१२/- |
| ५ | ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले उद्यान, जगताप डेअरी (भाग १) | १०/२/ २०१६-१७ | मे. तावरे कन्स्ट्रक्शन कंपनी | १,०२,५७३/- | १४/८/२०१७ | ३०/९/२०२१ | ३१/१२/२०२१ | ३,०७,७१९/- |
| ६ | ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले उद्यान, जगताप डेअरी (भाग २) | १/२/२०१८-१९ | मे.सदिच्छा कन्स्ट्रक्शन | ७७६९८/- | १६/८/२०२० | ३०/९/२०२१ | ३१/१२/२०२१ | २,३३,०९४/- |
| ७ | नाला पार्क उद्यान, से.नं. ७ व १० | १०/१/ २०१६-१७ | मे.निसर्ग लॅन्डस्केप सव्हिसेस | ४,०५,३५५/- | २१/८/२०१७ | ३०/९/२०२१ | ३१/१२/२०२१ | १२,१६,०६५/- |
| ८ | भोसरी सहल केंद्र | १०/२/ २०१६-१७ | मे. तावरे कन्स्ट्रक्शन कंपनी | ४,४६,५९४/- | २०/८/२०१७ | ३०/९/२०२१ | ३१/१२/२०२१ | १३,३९,७८२/- |
| ९ | दुगदिवी उद्यान | १५/२०१८-१९ | मे. तावरे कन्स्ट्रक्शन कंपनी | ४,०५,३०२/- | ८/३/२०१९ | ३०/९/२०२१ | ३१/१२/२०२१ | १२,१५,९०६/- |
| १० | मनपाचे विर सावरकर गणेश तलाव) | ८/१ /२०१७-१८ | मे. तावरे कन्स्ट्रक्शन कंपनी | ३,१४,२७४/- | १६/१/२०१८ | ३०/९/२०२१ | ३१/१२/२०२१ | ९,४२,८२२/- |
| ११ | चिखली रोपवाटिका | १४/ २०१८-१९ | मे.सदिच्छा कन्स्ट्रक्शन कं. | १,०३,६९४/- | ०८/०३/२०१९ | ३०/०९/२०२१ | ३१/१२/२०२१ | ३,११,०८२/- |
| १२ | संत ज्ञानेश्वर उद्यान | ६/२०१८-१९ | मे. तावरे कन्स्ट्रक्शन कंपनी | १,८७,७१३/- | ९/३/२०१९ | ३१/८/२०२१ | १५/१०/२०२१ | २,८१,५७०/- |
| १३ | मनपाचे विविध कार्यक्रमासाठी हार, फुले, गुच्छ,नारळ इ.साहित्य पुरविणे | १९/१/ २०१७-१८ | मे.लक्ष्मी फ्लॉवर्स अँन्ड डेकोरेशन | --- | ३१/३/२०१८ | ३०/९/२०२१ | ३१/१२/२०२१ | ६,००,०००/- |
| १४ | दापोडी बुध्द विहाराशेजारील उद्यान | ३/२- २०१९-२० | मे.सदिच्छा कन्स्ट्रक्शन कं. | ४३७०१/- | १८/२/२०२० | ३०/९/२०२१ | ३१/१२/२०२१ | १,३१,१०३/- |
| १५ | से.नं.२७ नर्सरी येथे माळी मजुर पुरविणे | ०१/२०१९-२० | मे.अथर्व स्वयं.औद्योगिक सेवा संस्था | २२३४५९/- | २/११/२०२० | ३०/९/२०२१ | ३१/१२/२०२१ | ६,७०,३७७/- |
| | | | | | | | एकुण | ८३,७२,१५८/- |

18/10/21

अति.आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८

(क्र.पापु/८/कावि/३९३/२०२१ दि.१३/१०/२०२१ विषय क्र.१६ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पाणीपुरवठा विभाग पिंपरी-१८
क्र.पापु/कावि/०८/३९३/२०२१
दि १३/१०/२०२१

प्रपत्र अ ( १ तेर ३ )

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कानाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | रॉयल्टी व मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून निविदा रक्कम | रॉयल्टी ची रक्कम | मटेरियल टेस्टिंग चार्जेस | स्विकृत दर | | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम खालीलप्रमाणे (+ त्यावरील वस्तु व सेवा कर प्रचलित दराने अदा करावा.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | | १३ |
| १ | मे.एस आर.एंटरप्राय्जेस | २०/१२/२०२०-२१ | सेक्ट.२३ निगडी येथील जलशुद्धीकरण केंद्रातील विविध युनिट्सकरिता EOT Crane पुरविणे,बसविणे व कार्यान्वित करणे . | 03-06-2021 | पापु /८/कावि/३४३/२०२१ | 17-09-2021 | 24,92,720 | 24,92,720 | 0 | 0 | 12.96 | % कमी | 21,69,663 |
| एकुण र.रु. | | | | | | | २४,९२,७२० | २४,९२,७२० | ० | ० | | | २१,६९,६६३ |

कार्यकारी अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८